सहस्रबुद्धे महाराज

टेंबे स्वामी

स्वामी शिवानंद

जयरामनाना महाराज

उमदीकर महाराज

माणिक प्रभू

श्री विनोबा

निसर्गदत्त महाराज

# ॥ संतबोध ॥

भाग-१

डॉ. सुहास पेठे

स्वामी रामतीर्थ

स्वामी रामदास

गोंदवलेकर महाराज

श्री माताजी

श्री जे. कृष्णमूर्ती

निंबरगी महाराज

मामासाहेब दांडेकर

गुप्ते महाराज

# संतबोध

## भाग : १

(उद्‌बोधक संतवचनांची निरूपणे
संतांच्या नव्या आरतीसह)

**डॉ. सुहास पेठे**

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* संतबोध :- १

पुस्तकरूपाने प्रकाशित पाचवी आवृत्ती : मे २०१६
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
**वेबसाईट :** www.pethekaka.com
**युट्यूब चॅनेल :** Shri Pethe Kaka
**अँड्रॉईड ॲप :** SadhanNandadeep **(साधननंदादीप)**

नारिंग्रे येथील श्रीराम मंदिरात बेचाळीस वर्षे
श्री विठ्ठलकृपेने तपाचरण व श्रीरामसेवा करणारी
आमची कर्मयोगिनी आजी

कै. श्रीमती अंबिकाबाई महादेव पेठे

आणि
तिला लौकिक व अलौकिक आश्रय देणारे
आराध्य दैवत

श्रीराम

या माझ्या उपासनेच्या मूल, प्रिय व आदरणीय स्रोतांना
ही संतसेवा

श्रद्धा व कृतज्ञतापूर्वक अर्पण...

... सुहास पेठे

## संतवचनांचं अथांग दालन..

या युगातील मोठा, दृश्य, सार्वत्रिक चमत्कार म्हणजे संत होत. आपल्यासारख्याच जन्माला आलेल्या, आपल्यासारख्या वातावरणात राहूनही देवपदाला पोचलेल्या, तसंच इतरांनाही हे पद प्राप्त व्हावं, निदान त्यांच्या जीवनातलं दु:खं, चिंता, विवंचना हे थोडं तरी हलकं व्हावं म्हणून निरलसतेनं आपलं आयुष्य वेचणाऱ्या या व्यक्ती म्हणजे सगुण अवतारच होत. ते देहानं गेले तरी सूक्ष्मरूपानं अनंत काळपर्यंत ईश्वरी इच्छेनुसार श्रद्धावंतांसाठी असंच कार्य करीत असतात.

अशा संतांनी माणसावर ठेवलेल्या अनेक ऋणांपैकी एक ऋण त्यांच्या वचनांचं. हे संतवचनांचं दालन अथांग आहे. त्यांतून मिळणारा बोध हा संतांना स्वत:ला झालेला व त्यांनी आचरलेला असल्यानं तो आपल्याला घेण्यासारखा आहे. ज्या असंख्य वचनांनी इतरांप्रमाणंच मलाही आजवर प्रेरणा दिली, प्रसंग -व्यक्ती-विचार यांकडं बघण्याची विधायक,अनेकदा पूर्ण नवीन दृष्टी दिली,त्यांचा कोणास उपयोग होत असल्यास व्हावा या हेतूनं ही संकलनं प्रसिद्ध होत आहेत.

या वचनांच्या मला वाटलेल्या उपयोगाची दिशा समोर यावी यासाठी वचनांचं थोडक्यात निरूपण दिलेलं आहे. संतवचनं अर्थगर्भ व शाश्वत असल्यानं वाचक आपापल्या जीवनाच्या ठेवणी व गरजांनुसार अधिक अर्थ घेऊ शकतीलच. संतांचं, संतवचनांचं व ती मुळात उपलब्ध करून देणाऱ्या प्रकाशकांचं ऋण न फिटणारं आहे. वाचकांच्या सहृदय प्रतिसादामुळं आता ही पुढची आवृत्ती श्रीकृपेनं प्रसिद्ध होत आहे.

संतछायेच्या प्रकाशनांना नेहमीप्रमाणं सेवाभावानं वितरण, व्यवस्थापन इत्यादी साहाय्य करणाऱ्या साधकांचा, तसंच पुस्तक आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचा, मी अत्यंत ऋणी आहे.

**संतछाया, सातारा** — **सुहास पेठे**

# संतबोध : भाग -१

## * वचनक्रम *


| क्र. | वचनाचा आरंभ | संतनाम | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | मला शक्य नाही.. | श्री माताजी | ७ |
| २. | दु:खे व संकटे यांमुळे.. | स्वामी रामतीर्थ | ९ |
| ३. | स्वत:चा एवढा ग्रंथ.. | श्री जे. कृष्णमूर्ती | ११ |
| ४. | मी गुरुपुत्र आहे.. | उमदीकर महाराज | १३ |
| ५. | नि:स्वार्थ काम.. | गोंदवलेकर महाराज | १५ |
| ६. | दान हे परिग्रहाचे.. | श्री विनोबा | २० |
| ७. | कलियुगात जन्माला.. | स्वामी शिवानंद | २२ |
| ८. | अभ्यास न करता.. | सहस्रबुद्धे महाराज | २४ |
| ९. | जगात काम करणे.. | निसर्गदत्त महाराज | २६ |
| १०. | स्वत:च्या डोळ्यांनी.. | स्वामी रामतीर्थ | २९ |
| ११. | रोग म्हणजे देवाच्या.. | निंबरगी महाराज | ३१ |
| १२. | बदली झाल्याने.. | श्री टेंबे स्वामी | ३४ |
| १३. | कर्मठ 'उपासने'चेही.. | श्री विनोबा | ३७ |
| १४. | ज्ञानेश्वरी वाचल्याशिवाय.. | मामासाहेब दांडेकर | ४० |
| १५. | आपण पूर्वी काय होतो.. | श्री माताजी | ४३ |
| १६. | दु:ख ही शोधासाठी.. | निसर्गदत्त महाराज | ४५ |
| १७. | माणसाने ऑर्डिनरी.. | सहस्रबुद्धे महाराज | ४७ |
| १८. | धनधान्यपुत्रप्राप्तीचे.. | गुप्ते महाराज | ५० |
| १९. | भगवंताबद्दल कृतज्ञता.. | श्री माताजी | ५३ |
| २०. | शरीरशक्ती व धनशक्ती.. | जयरामनाना महाराज | ५६ |
| २१. | आपला अनुभव इतरांना.. | मामासाहेब दांडेकर | ६२ |
| २२. | आम्हाला धरता येते, पण.. | श्री माणिक प्रभू | ६६ |
| २३. | कृपा सर्वांवर सारखीच.. | स्वामी रामदास | ७२ |


***

## ♣ संतांची आरती ♣

गाऊ संतांची आरती । देव जागा करिती चित्ती ।।धृ।।

निर्गुण दुर्लभ देव झाला । त्यांनी सगुणात आणिला ।।१।।
स्वार्थी जीव जो गुंतला । त्याला परमार्थी लाविला ।।२।। गाऊ..

खोटा कर्ता जो तो झाला । कोण कर्ता तो दाविला ।।३।।
प्रारब्धाची पुसली रेखा । यत्न देव हा ओळखा ।।४।। गाऊ..

मिथ्या अशुद्ध देव गेले । शुद्ध देवांसी स्थापिले ।।५।।
सद्गुण स्वप्नीचे वाटले । त्यांनी जगुनीया दाविले ।।६।। गाऊ..

लोकांसम हे जगती आले । मात्र मृत्यू पुसुनी गेले ।।७।।
सूक्ष्म रूपात राहिले । प्रमाण आजहि देती भले ।।८।। गाऊ..

अपार बुद्धीचे सागर । केला सूक्ष्माचा व्यवहार ।।९।।
सोने मातीत दाखविती । मीपण सरता हाती देती ।।१०।। गाऊ..

पैसा भपका केला दूर । साधेपणावरी भर ।।११।।
प्रेम नि:स्वार्थाचे भजन । अवघे त्यागाचे जीवन ।।१२।। गाऊ..

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।१३।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।१४।। गाऊ..

**।। सब संतन की जय ।।**

*

# १.

## मला शक्य नाही असे कधीच म्हणू नका. अधिक खोल विचार करा. त्याचा अर्थ मला ते नको आहे असा होतो.

- श्री माताजी (अरविंदाश्रम)

प्रापंचिक कामं काय, पारमार्थिक साधना काय कुठल्याही बाबतीत काही करायचा प्रश्न आला की 'ते मला शक्य नाही'अशी प्रतिक्रिया सहजपणे ऐकू येते. त्यातल्या त्यात एक वेळ प्रापंचिक कामात स्वत:ला एखादी गोष्ट करायची असली की, माणूस अशी प्रतिक्रिया देत नाही, हे लक्षात घेण्यासारखं आहे. किंबहुना आयुष्यात कधी न केलेल्या, न ऐकलेल्या, पूर्वी कधीही न येणाऱ्या, जमतील असं वाटत नाही अशा कित्येक गोष्टी प्रपंचात समोर येत असतात. पण म्हणून सर्वच बाबतीत 'मला ते शक्य नाही' असं माणूस म्हणताना दिसत नाही.

उलट असं आढळेल की, माणूस त्या गोष्टी त्याला मनापासून हव्या असल्या म्हणजे त्यासाठी साधनं गोळा करील, पैसा उभा करील, कर्ज काढील, इतरांची मदत घेईल, कुणाच्या पाया पडायला लागलं तरी पाया पडेल पण ती ती हवी असलेली गोष्ट करीलच. त्यासाठी स्वत:सुद्धा राबेल, स्वत:च्या सूक्ष्म क्षमतांचा शोध घेईल, नवनवीन कौशल्य शिकेल. पण हीच त्याची प्रवृत्ती सर्वच कामांत दिसेल का? तर नाही.

काही काही प्रापंचिक गोष्टींना तो 'मला शक्य नाही' असंही म्हणतो. विशेषत: या बोधवचनात ज्यांचा संबंध आहे अशा पारमार्थिक

साधनांच्या बाबतीत तर खूपच वेळा, खूप लोकांकडून 'आम्हाला ते शक्य आहे का ? ते वेगळ्याच लोकांचं काम आहे, त्यासाठी ती माणसं जन्माला यावी लागतात, उपजतच लागतं, आम्हाला वेळच मिळत नाही' अशा असंख्य प्रकारे माणसं 'मला शक्य नाही' हे बरेचदा म्हणताना आढळतात.

मग अशी पारमार्थिक साधनं म्हणजे पूजाअर्चा, पाठ-पारायणं, पोथी-ग्रंथ-वाचनं, तीर्थयात्रा अशी काही असोत किंवा मौन, नामस्मरण असो, गाथा-ज्ञानेश्वरीचा अभ्यास असो, उत्तमोत्तम श्रवण असो, वृत्ती बदलण्याचे प्रयोग असोत, विचारविकार आवरणं, सदाचरण असो की आणखी काही. मूळ तथ्य हे आहे की, कठीणात कठीण, अपरिचित प्रापंचिक गोष्टी पार पाडणारी कर्तृत्ववान माणसं काही प्रापंचिक कामांना किंवा विशेषत: पारमार्थिक साधनांना 'शक्य नाही' म्हणतात तेव्हा तिथं त्यांच्या कुवतीचा, सामर्थ्याचा प्रश्न नसतो तर मुळात त्यांच्या इच्छेचा, आवडीचा प्रश्न असतो.

प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट शक्य असते असं इथं अर्थातच अभिप्रेत नाही, तर अशा 'शक्य नाही'च्या प्रतिक्रियेमागचं खरं कारण दर्शवणं आणि प्रामाणिकपणे ते मान्य करणं, शक्य असल्यास ती ती गोष्ट अवश्य करून त्याचा लाभ सर्वांनी घेणं हे अभिप्रेत आहे. कारण असं करण्यात आपल्याच उद्धाराचा मार्ग चालणं आपल्यालाच सोपं होणारं आहे.

*

# २.

## दु:खे व संकटे यांमुळे आपण कळत अगर नकळत अधिक शहाणे व सावध होतो.

- स्वामी रामतीर्थ

सामान्य माणसाला दु:खं, संकटं, अपयशं अशा गोष्टी नकोशा वाटतात. या गोष्टी टळाव्या म्हणून त्याचे प्रयत्नही सुरू असतात. प्रथम हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, दु:खं किंवा अपयशं ही अनेकदा आपल्या चुकीच्या कर्मांचे परिणाम असतात. त्यामुळं कर्मं निर्दोष होण्यासाठी, म्हणजेच पुढं अपयशाचा दुष्परिणाम भोगावा लागू नये म्हणून योग्य माहिती, मार्गदर्शन, अचूक प्रयत्न - हे सारं करणं आणि त्या संदर्भात दु:खं - अपयशांचा विचार करणं, हे सामान्य माणसाच्या दृष्टीनं ठीकच आहे.

पण प्रयत्नांची सारी काळजी घेऊन किंवा प्रयत्नात काही कमी पडून किंवा काही अनपेक्षित कारणांनीसुद्धा माणसाला दु:खं, संकटं, अपयशं पदरात पडतातच. पण या गोष्टी स्वीकारायची मनाची तयारी नसल्यानं निराशा-भय अशा चुकीच्या चक्रात माणूस सापडतो. मग त्याच्या हातून भांबावलेल्या-भ्रमित अवस्थेत अनेकदा चुकीच्या कृती घडतात. त्यातून पुढली दु:खं-संकटं उभी राहातात. अखेरीस इतर माणसांना, परिस्थितीला किंवा नशिबाला माणूस दोष देत राहातो.दुसऱ्या बाजूला यातून कसं सुटावं, हेही लक्षात येत नाही. अशा वेळी या

वचनामुळं दु:खाकडं बघण्याचा एक महत्त्वाचा दृष्टिकोन समोर येऊ शकतो.

वर सांगितलेल्या परिस्थितीत अडकण्याचं महत्त्वाचं कारण दु:खं, संकटं, अपयशं अशा गोष्टींचं आयुष्यातलं अपरिहार्य, मोलाचं स्थान व उपयुक्तता यांची कल्पनाच माणसाला नसते. सुखं, यशं, निर्विघ्नता यांनी आयुष्य सुकर व सुखी वाटलं तरी त्यांनी माणसात एक प्रकारची ढिलाई व बेसावधता येते. अनेकदा यामुळं स्वत:च्या कर्तृत्वाबद्दल अहंकारही निर्माण होतो.

शिवाय मूलभूत मानवी अपूर्णतेमुळं म्हणा किंवा सृष्टीच्या दुर्जेय सामर्थ्यामुळं म्हणा, व्यक्तिगत पातळीवर अपयशं - दु:खं काही प्रमाणात अपरिहार्यही ठरतात. म्हणून आयुष्याचा अपरिहार्य भाग म्हणून ती स्वीकारली, विधायकपणे घेतली तर माणूस शांत-सावध होतो, त्या अर्थानं तो शहाणाही होतो. मग दु:खं प्रगतीला उपकारक ठरतात. नम्रतेच्या सद्गुणाच्या वाढीला उपयोगी ठरतात.

हे सारं लक्षात आलं, तर दु:खं, संकटं, अपयशं यांच्याकडं कृतज्ञतेनं पाहाता येईल.

*

# ३.

## स्वत:चा एवढा ग्रंथ वाचायचा पडलेला असताना इतरांचे ग्रंथ आपल्याला कशासाठी वाचावयास हवे ?

- श्री जे. कृष्णमूर्ती

खरं तर प्रत्येक मनुष्य बाह्य जगाची छोटीशी प्रतिकृती असतो. बाहेर असलेली माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तीतली विविधता, लोभ-मत्सर-असूया, बऱ्या-वाईट वासना, कृती, लहान-थोरपणा, उत्कृष्ट-निकृष्टता - अशा असंख्य गोष्टी त्याच्या स्वत:च्या ठिकाणी, त्याच्या अंतर्यामीही विद्यमान असतात. त्याचं प्रमाण, मिश्रण थोड्या -फार वेगळ्या प्रमाणात असतं, इतकंच. काहींना या वस्तुस्थितीची जाणीव कधीतरी होते, काहींना ती आयुष्यभर होतही नाही.

पण सर्वसाधारणपणे सर्वांनाच जगाची, इतर माणसांची, त्यांच्या स्वभावांची, त्यांच्या वैशिष्ट्यांची, त्यांच्या आयुष्यातल्या घडामोडींची मोठीच उत्सुकता असते. या साऱ्या जगाची, इतरांच्या आयुष्याची माहिती मिळावी म्हणून तो दररोज धडपड करीत असतो. विविध मार्गांनी, वेळ नसला तरी वेळ काढून, त्यासाठी पैसा खर्च करून, प्रवास करून, आश्चर्य वाटेल एवढे त्रास घेऊन तो ही माहिती मिळवतो. नुसतीच मिळवीत नाही, तर त्यावर विचार करतो, चिंतन करतो, त्यावर स्वत:ची मतं मांडतो, आग्रह धरतो, ग्रह बनवतो - ते सारं इतरांना सांगून त्यांचे पूर्वग्रह तयार करतो. यात माणसाच्या आयुष्याचा एकंदरीत लक्षणीय काळ जातो.

बरं, या साऱ्या उद्योगानं स्वत:ची बहुधा निकृष्ट असलेली स्थिती बदलायला, सुधारायला, समाधानप्राप्तीला उपयोग होईल म्हणावं, तर तसंही होत नाही. उलट अनेकदा स्वत:ला अस्वस्थता येणं, मन कलुषित होणं, खिन्न होणं, दुसऱ्यांबद्दल तिरस्कार, तिटकारा निर्माण होणं,वातावरण गढूळ होणं - असले दुष्परिणामच सहन करावे लागतात. अशा ज्ञानानं नि चर्चेनं स्वत:चं अंतरंग बदलतही नाही नि सुधारतही नाही. उलट एक तर आयुष्याचा अमूल्य वेळ वाया जातो आणि स्वत:ला बदलण्याचं-सुधारण्याचं काम तसंच राहून जातं.

यासाठी या वचनाच्या निमित्तानं कृष्णजी याकडं लक्ष वेधीत आहेत की, यापेक्षा आपल्या स्वत:च्या अंतर्यामाचा, स्वभावाचा, संस्कारांचा, आंतरिक विसंवादाचा वेध घेतला तर या इतर जगाच्या ज्ञानाची गरज उरतच नाही.

स्वत:च्या 'अंतर्यामा'चा हा ग्रंथ अभ्यासायला कधीही उपलब्ध आहे. त्या अभ्यासानं स्वत:च्या बदलाची दिशा कळेल, मार्ग कळेल, प्रयोगानं पालटही घडेल, आंतरिक सुसंवाद निर्माण होऊन त्यातून समाधान निर्माण होईल. म्हणून अकारण तरी इतरांच्या ग्रंथांच्या, जगाच्या ग्रंथाच्या नादाला लागून आपलं मोलाचं आयुष्य व शक्ती दवडू नये आणि त्यापायी स्वत:चं नुकसान स्वत:च करू नये, हे खरं !

*

# ४.

## मी गुरुपुत्र आहे याचे सतत स्मरण ठेवावे.

### - श्री भाऊसाहेब उमदीकर महाराज

माणसाच्या व्यवहारावर स्मरणाचा फार मोठा परिणाम होत असतो. साधीसाधी कामंही स्मरणाच्या बळावर सुरू असतात, स्मरणावर अवलंबून असतात. एखादं कामं कितीही महत्त्वाचं असलं, तरी त्याचं एकदा स्मरण गेलं की, व्यवहारात अक्षरश: ते काम माणूस करूसुद्धा शकत नाही. म्हणून काम कोणतं करायचं याचं स्मरण व्हावं, म्हणून माणूस स्मरणार्थ नोंदीसारख्या अनेक युक्त्याही अंमलात आणतो.

अर्थात या साऱ्यांनी माणसाला कामाचं स्मरण होतं, ते व्हायला मदत होते, प्रत्यक्ष ते काम घडतं-एवढंच. नुसत्या कामाच्या स्मरणानं कामाची निवड, कौशल्य, दर्जा, प्रत, दूरगामी उपयुक्तता या गोष्टी घडतात असं नाही. ते सारं घडायलाही स्मरणाचीच गरज असते. ते स्मरण असतं ते काम करण्याच्या उत्तम पद्धतीचं, ते काम करण्यामागच्या हेतूचं,कामांची निवड करताना वापरायच्या कसोट्यांचं, ते काम करणाऱ्या कर्त्याचं-त्याच्या कुवतीचं,ध्येयाचं,मूल्यांचं,निष्ठांचं.

या इतर स्मरणांमध्ये कर्त्याच्या या स्मरणाचं फारच महत्त्व आहे. कारण या कर्त्याचं भान राहिलं, तर कर्माची सारी प्रतच बदलून जाते. जसा साध्या व्यवहारात काम करणारा कंटाळलेला असला, निरुत्साही असला की, कामाची प्रत निकृष्ट, यथातथा होते आणि त्याऐवजी तो करणारा उत्साही, दक्ष असला की, तेच काम उत्कृष्ट होतं, तसंच काहीसं

या कर्त्याचं आहे. कर्त्याचं ज्ञान, कौशल्य, मर्यादा अशा अनेक गोष्टींचा आणि त्याहीपेक्षा कर्माच्या क्षणी असलेल्या त्यांच्या स्मरणाचा कर्मावर योग्य परिणाम झाला नाही तरच नवल.

या साऱ्यातही कर्त्याचं स्मरण हे कर्तेपणाचा अहंभाव अशा अर्थानं नाही, तर 'आपण कोण आहोत, कुणाचे आहोत' याचं ते स्मरण आहे. एखादा माणूस न्याय देण्याचं काम करतो आहे अशा वेळी त्याच्या माणूसपणाचं, कायदेकानूंच्या ज्ञानाचं स्मरण त्याला आवश्यक आहेच. पण तो 'न्यायाधीश' आहे, याचं स्मरण त्याला त्या कर्माच्या वेळी असणं हे, ते काम आदर्श होण्यासाठी अत्यावश्यक असतं. ते असलं की तो आपोआपच तटस्थ, नि:पक्षपाती, उचित न्याय देऊ शकतो.

अशाच तऱ्हेच्या कर्त्यासंबंधीच्या साऱ्या स्मरणात सर्वांत महत्त्वाचं स्मरण 'गुरूं'चं आणि आपण गुरुपुत्र आहोत याचं आहे. गुरू किंवा सद्गुरू म्हटलं म्हणजे दैवी गुण, शांती, नम्रता, दया, गुरूंनी केलेली दुर्लभ कृपा, सांभाळ - अशा अनेक सात्त्विक गोष्टींचं स्मरण. या स्मरणानं आपल्यावर गुरुपुत्र म्हणून वागण्याची जबाबदारी येते. ती आपोआपच आपल्या हातातल्या कामांची प्रत विलक्षणपणे बदलवते. त्यामुळं आपलंही जीवन उन्नत व सार्थकाचं होतं आणि पर्यायानं समाजाचंही. त्यासाठी आपण 'गुरुपुत्र' आहोत याचं स्मरण सदैव कसं राहील, यासाठी मात्र प्रयत्नशील असावं.

*

## ५.

# नि:स्वार्थ काम करणाऱ्यांनाही उपासनेची जरूरी आहेच.

- श्री गोंदवलेकर महाराज

अपूर्ण आकलनावर आधारलेल्या काही ठाम समजुती माणसाच्या प्रगतीच्या आड कशा येऊ शकतात ते दाखवणारं हे एक अनमोल वचन आहे. सदाचरणानं राहाणं, आरोग्याचे नियम सांभाळून आहारविहार करणं, आपल्या कौटुंबिक - सामाजिक जबाबदाऱ्या योग्य तऱ्हेनं बजावणं, नि:स्वार्थीपणे लोकांना मदत करणं - अशा अनेक आदर्शवत गोष्टी करणारी माणसं सर्व काळी प्रत्येक समाजात असतात.

इतकंच नव्हे तर त्यांचं ते संयमित आणि आदर्श वर्तन अत्यंत दुर्लभ व अनुकरणीय असतं. अशी माणसं जास्तीत जास्त प्रमाणात लाभणं हे त्या त्या समाजाचं भाग्यच म्हटलं पाहिजे. या कशाबद्दल दुमत असण्याचं कारण नाही.

पण अशा नि:स्वार्थी व संयमित जीवन जगणाऱ्या लोकांतले अनेक जण भगवंत मानीत नाहीत, निसर्ग असो, सूक्ष्म अनंत सत्ता म्हणून असो, विश्वाचा कर्ता म्हणून असो - कुठल्याच रूपात ते भगवंत मानीत नाहीत. साहजिकच अशा भगवंताच्या उपासनेचा मग आपोआपच प्रश्न नसतो.

एवढंच नाही तर आम्ही एवढे सदाचारी व नि:स्वार्थी कामं

करणारे असताना आम्हाला कुठल्याच कारणांसाठी देव मानण्याची, त्याचं स्मरण ठेवण्याची किंवा कुठल्याही स्वरूपात त्याची उपासना करण्याची कुठली आवश्यकता दिसत नाही अशी त्यांची ठाम समजूत असते.

त्यातले अनेक जण आम्ही 'देव', 'उपासना' वगैरे सारखा कुठला अनावश्यक भाबडेपणा, भोळसटपणा, वेळी बावळटपणा करीत नाही, असंही अभिमानानं सांगतात. त्यातले काही 'देव-उपासना' यांच्यावर टीकाही करतात. अर्थात अशा वर्गातल्या माणसांची वागणूक नि:स्वार्थी असल्यानं इतर अनेकांना हे म्हणणं रास्त वाटतं, मोठं बुद्धिनिष्ठ व अनुकरणीय वाटतं, हे खरं.

वरवर पाहाता हे म्हणणं पटण्यासारखं असलं, तरी असा विचार करणारे हे क्वचितच लक्षात घेतात की, मनुष्य नि:स्वार्थी, सदाचारी वगैरे असतो तो कुठपर्यंत? जोपर्यंत त्याच्यावर विवेकाचा अंमल चालतो तोपर्यंत. आजवर असा विवेकाचा अंमल चालत आला असला किंवा आज अगदी या क्षणीही तो चालत असला तरीही कुठल्याही एखाद्या क्षणी तो अंमल जाऊ शकतो.

अशा वेळी एखादी ठिणगी सारं जंगल भस्मसात करायला पुरेशी ठरावी, तशी माणसाची सारी नि:स्वार्थी कर्मं - सदाचार एखाद्या स्वार्थी विचारानं, आसक्तीनं, अपेक्षेनं - किंवा अशा गोष्टींच्या सुरुवातीनंसुद्धा - मातीमोल होऊ शकतात. तसा हा नि:स्वार्थतेचा डोलारादेखील कधीही कोसळू शकतो.

काही वेळा अनेकांच्या बाबतीत हा डोलारा बाह्यत: कोसळलेला न दिसला किंवा त्यांनी न दाखवला, तरी अंतरंगात तो कोसळू शकतो. अनेकदा आयुष्यभर नाही, पण उत्तरायुष्यात कोसळतो. अशा वेळी स्वत:च्या विवेकावर अवाजवी भिस्त ठेवणं ही बुद्धिमानी न ठरता त्याज्य असा बेसावधपणा ठरतो. कारण 'विवेका'चं क्षेत्रच मुळात अतिसूक्ष्म व

मानवी बुद्धीच्या पूर्ण आटोक्यातलं नाही.

म्हणून ते ज्या 'अज्ञाता'च्या नियंत्रणात असेल त्याला निदान मनानं शरण जाणं हिताचं असतं. मग त्यासाठी त्या 'अज्ञाता'ची कुठल्या ना कुठल्या स्वरूपात कोणी उपासना करो किंवा न करो.

दुसरे दोन मुद्देही जाताजाता लक्षात घेतलेले बरे. ते असे की, अशा अनेक 'नि:स्वार्थी' काम करणाऱ्यांना स्वत:लाच ते तसे आहेत, असं वाटतं. त्यामुळं 'नि:स्वार्थी'पणाच्या निर्णायक कसोटीला उतरणं कठीण, पण गरजेचं आहे.

दुसरा मुद्दा असा की, एखाददुसऱ्या बाबतीत नि:स्वार्थी असणं आणि इतर कुठल्या बाबतीत कळत नकळत स्वार्थी असणं हेही अनेकदा आढळतं. अशा वेळीसुद्धा माणसं भ्रमानं स्वत:ला जणू सर्वच बाबतीत आपण नि:स्वार्थी असल्याचं मानतात, तेही सावध राहाण्यासारखंच आहे.

आता 'उपासने'ची गरज स्पष्ट करणारी दुसरी महत्त्वाची बाब अशी की, बुद्धी, क्षमता या गोष्टी एखाद्याकडं विपुल असल्या किंवा त्याला स्वत:ला त्या तशा वाटल्या तरी साऱ्या विश्वाच्या पसाऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्या अत्यंत नगण्य असतात. म्हणूनच मानवी बुद्धीनं अगदी नि:स्वार्थी निर्णयाच्या मार्गानंही भविष्याला गवसणी घालता येते, पण 'निर्णायक' गवसणी घालता येत नाही.

पाचपंचवीस वर्षांतच आपले निर्णय व तथाकथित 'नि:स्वार्थी' कामं चुकीची ठरल्याची शेकडो उदाहरणं व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक जीवनात पदोपदी आढळतात.याचा अर्थ निर्णय घेऊ नयेत किंवा नि:स्वार्थी कामं करू नयेत असा नसला, तरी या मानवी मूलभूत अपूर्णतेचं भान माणसानं सातत्यानं बाळगणं हे शुद्ध, सरळ, नम्र व प्रामाणिक बुद्धीचं लक्षण आहे.

याचा सरळ अर्थ म्हणजे जास्तीत जास्त योग्य, नि:स्वार्थी निर्णय

घेणं, पण तो चुकू नये यासाठी भगवंताची मन:पूर्वक प्रार्थना करणं - जी प्रार्थना तो निर्णय आवश्यक असल्यास थोडा बरोबर करण्याची बुद्धी आपल्याला देईल किंवा त्या निर्णयाच्या कृतीमुळं होणाऱ्या हानीचं प्रमाण सौम्य राखील. ही प्रार्थना म्हणजेच उपासना होय. या उपासनेची गरज मानवी अपूर्णतेच्या दृष्टीनं नि:स्वार्थी माणसांनाही आहे.

तिसरी गोष्ट अहंकाराची. माणसाला शुद्ध विचारानं हे कधीही अनुभवाला येऊ शकतं की, सर्वांत फसवी व सूक्ष्म गोष्ट असेल तर ती 'अहंकार' ही होय.

मनुष्य कितीही सावध राहून कार्य करीत असला आणि नि:स्वार्थीपण, सदाचरण जोपासत असला, तरी त्याला नकळत त्या त्या कर्मांचा, त्यांतल्या यशाचा, कर्तृत्वाचा, त्यामुळं आलेल्या मानमान्यतेचा, लोकादराचा कधी अहंकार होईल हे सांगता येत नसतं. किंबहुना वाळवीसारखाच तो कधी वर दिसत नाही, पण पोखरण्याचं काम कधी पूर्ण करून जातो, तेव्हा प्रसंगवशात दिसतो.

अनेकदा अनेक सावध माणसांना, नि:स्वार्थी माणसांना, निरपेक्ष माणसांना आपण तसे आहोत असं अगदी ठामपणे वाटतं, ते त्या त्या वेळी प्रामाणिकही असतं. पण पुढं कधी कधी एखाद्या क्षुल्लक प्रसंगातसुद्धा कुणी मान - दाद - प्रतिसाद दिला नाही, जाणीव - कृतज्ञता दाखवली नाही तर अहंकाराच्या गळाला अशा एरवी खरोखर नि:स्वार्थी असलेल्या माणसांचा मासा अलगद लागतो आणि अशा माणसांचा नाश घडतो.

अशा वेळी अहंकार होऊ नये म्हणून,'मी जे नि:स्वार्थी काम करतो आहे, जे नि:स्वार्थीपण राखायचा प्रयत्न करतो आहे, ते नि:स्वार्थीपण, हे भगवंता, तुझ्या कृपेनं आहे, ही माझी निरहंकार- नि:स्वार्थ वृत्ती आजन्म टिकू दे', 'हे तुझ्या कृपेनं घडतं आहे, तुझ्या कृपेनंच ते टिकू दे' असं म्हणण्यालाच 'उपासना' म्हणतात.

इथं हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, उपासना म्हणजे लौकिक अर्थानं पूजा-पाठ-पारायणं असं इथं अभिप्रेत खचितच नाही. त्याही उपासना आहेत. पण अंतिम कर्तृत्व भगवंताचं आहे याचं भान, तशी वृत्ती आणि त्यानुसार व्यवहार करणं अशा कृती या खऱ्या उपासना होत. कारण या उपासना निःस्वार्थी काम करणाऱ्या माणसातसुद्धा नकळत शिरकाव करणाऱ्या अपेक्षेला स्वार्थाला अटकाव करतात आणि त्याला भगवंतप्राप्तीसाठी आवश्यक शुद्धी द्यायला उपयोगी पडतात.

म्हणून अशा उपासनेची गरज अगदी निःस्वार्थ काम करणाऱ्यांनाही आहे. मग त्या उपासनेचं स्वरूप मनोमन शरणागतीचं, भगवंताच्या अस्तित्वाच्या जाणीवेचं, स्मरणाचं असो किंवा अन्य तत्सम काही असो.

*

# ६.

## दान हे परिग्रहाचे प्रायश्चित्त आहे, म्हणून त्यात अभिमानाला अवकाश नाही.

- श्री विनोबा

आपल्या प्रपंचाच्या गरजा आणि नंतर हौशी पुरवताना अनेकदा अनेकांना दान ही माझी जबाबदारी आहे, याची जाणीव होत नाही, ती व्हावी ही आधी पहिली पायरी. याची गरज अशासाठी आहे की, मला ज्या वेळी कोणतीही गोष्ट मिळते, त्या वेळी ती व्यक्तींकडून किंवा सृष्टीकडून आलेली असते. अशा आलेल्या गोष्टींनी माझी गरज पुरी होताच संचय निर्माण होऊ लागतो.

या अधिकच्या गोष्टी परत करण्याची व्यक्तिगत जबाबदारीही निर्माण होते. या जबाबदारीची जाणीव होऊन दान घडणं इतकं तरी प्रथम आवश्यकच आहे. जे या दानाच्या जबाबदारीचा विचारच कधी करीत नाहीत,त्यांच्यापेक्षा कधी ना कधीतरी हा विचार करणारे आणि त्यानुसार दानही करणारे हे नक्कीच श्रेष्ठ व अनुकरणीय लोक होत.

त्याही पुढे जाऊन विचार केला तर मग मात्र यात अधिक शिकण्यासारखं काय आहे ते लक्षात येईल. दान पैशाचं असो वा वस्तू, विद्या, स्थावर, जंगम कसलंही असो - ते दान बहुधा दिल्याचा अहंभाव नकळत निर्माण करतं. इतर कसली अपेक्षा नसली तरी निदान ज्यांना ते दान दिलं त्यांनी त्याची जाणीव, कृतज्ञता, उपकार मानावे एवढी तरी

अपेक्षा सहज निर्माण होते.

जो हे दान घेतो त्यानं घेतलेल्याची जाणीव ठेवणं हे अगदी रास्त असलं, तरी देणाऱ्यानं ती अपेक्षा बाळगू नये, हे खरं. कारण अपेक्षा काय, अहंकार काय असा कुठलाही खड्डा त्यात पडायला आणि मुक्तीची वाटचाल थांबवायला पुरेसा असतो. मुळातच अपेक्षा किंवा अहंकार बाळगण्याचं कारण अशासाठी नाही की, दान घडतं ते कसला तरी जरुरीपेक्षा जास्त परिग्रह म्हणजे संचय आपण केला म्हणून घडतं.

या अर्थानं विचार केला तर अतिरिक्त संचय हा मुळातच अपराध असल्यामुळं दानानं या संचयाच्या अपराधाचं प्रायश्चित्त घेण्याची संधी मिळत असते. इतर एखाद्या चुकीच्या कृत्याचं किंवा दुष्कर्माचं प्रायश्चित्त घेताना मनुष्य ते कर्म आणि त्याचं प्रायश्चित्त शक्यतो लपवण्याचा किंवा त्याचा विषय होऊ न देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतोच ना? मग अशा प्रायश्चित्ताचा अहंकार बाळगणं तर दूरच.

विचार केला तर लक्षात येतं की, वाट्याला आला म्हणून संचय होवो किंवा आपण केला म्हणून होवो, संचयाचंही प्रायश्चित्त घेताना हीच इतर प्रायश्चित्ताच्या वेळची वृत्ती ठेवणं आवश्यक आहे. मग दानाच्या बाबतीतही अहंकार बाळगता येणार नाही.

अशा तऱ्हेनं सावध राहून अभिमान न ठेवता दान करीत राहिलं, तर हेच दान आपली व्यक्तिगत जबाबदारी पुरी करणारं ठरेल, तसंच मुक्तीचा मार्ग सुकर करणारंही ठरेल.

*

# ७.

## कलियुगात जन्माला आलात त्याला नावं ठेवू नका, भाग्यवान आहात, नुसत्या नामानं मुक्त व्हाल.

- स्वामी शिवानंद

युगांच्या पारंपरिक भाषेत कलियुग शेवटचं मानलं आहे. त्याची अवस्था ही तुलनेनं तशी निकृष्टच मानलेली आहे. सर्वसामान्य माणूसही आजूबाजूला या युगातल्या वातावरणाचा अनुभव घेतो. त्यातही त्याला दुष्प्रवृत्ती-अनाचार यांचाच आढळ जास्त होतो. सरळपणा नाही, विश्वासार्हता नाही, निःस्पृहता नाही, सदाचार शक्य नाही, निष्पापता नाही, निर्लोभता नाही - असा एक निराशाजनक, नकारात्मक शिक्का या युगावर मारलेला दिसून येतो. अनेक सत्प्रवृत्त माणसांनाही बाह्य परिस्थितीत चांगलं, निर्मळ जगण्याचा प्रयत्न केल्यास नाउमेद व्हावं लागतं,अशाच घटनांचं सर्वत्र प्राबल्य आढळतं.

अशा वेळी हा विचार याच कलियुगाबद्दल किंबहुना आपल्या युगाबद्दल एक वेगळा, विधायक, सकारात्मक विचार समोर ठेवतो आहे. सत्प्रवृत्तीनं जगणं किंवा भगवंताची प्राप्ती किंवा मुक्ती मिळवणं असं एखादं ध्येय समोर ठेवलं, तर हे वचन म्हणतं की, आजची परिस्थिती त्याला प्रतिकूल नाही, अनुकूल आहे. भले इतर पूर्वीची युगं आपल्या परीनं श्रेष्ठ असतील, अपूर्वाईची असतील, पण त्यांतली याच भगवंतप्राप्तीची

साधनंही उलट अधिक कठोर व खडतर होती. फार मोठी शुद्धता, तपाचरण यांची अपेक्षा बाळगणारी होती.

आताच्या युगात, वातावरणात भले अशी कठोर साधनं नि तपश्चर्या या गोष्टी दुष्कर आहेत, कठीण आहेत, अशक्य आहेत. पण याच प्रतिकूल वाटणाऱ्या युगामध्ये भगवंताच्या प्राप्तीचं साधनही 'नामस्मरणा'सारखं निरुपाधिक, सोपं, सहज व सुलभ ठेवलेलं आहे.

युगव्यवस्थेप्रमाणं या कलियुगात बाह्य अनुकूलता कमी आहे. सर्वच प्रकारचं शारीरिक-मानसिक-भावनिक-वैचारिक प्रदूषण जास्त आहे. म्हणून युगव्यवस्थेनं या कलियुगात भगवंताच्या प्राप्तीसाठी करावं लागणारं साधनही 'नामा'इतकं सोपेपणाला आणून ठेवलं आहे, जे कितीही प्रतिकूलतेत अन् प्रदूषित अवस्थेत करता येईल. जो भगवंत खडतर तपाचरणानं प्राप्त होणारा, तोच भगवंत, तीच मुक्ती आणि तेच निरुपाधिक समाधान या साध्यासोप्या वाटणाऱ्या गोष्टी 'नामा'च्या साधनानं मिळण्याची व्यवस्थाही याच युगात केली आहे.

आहे त्या ठिकाणी राहून, आपलं विहित काम शक्य तितक्या चांगल्या तऱ्हेनं पार पाडताना आत नुसतं भगवंताचं स्मरण सांभाळलं किंवा ते टिकावं म्हणून 'नाम' घेत राहिलं, तरी युगाच्या एरवी प्रतिकूल, निराशाजनक, नाउमेद करणाऱ्या वातावरणाचा परिणाम न होता शांत, कर्तव्यरत, समाधानी राहाता येतं, हे या युगाचे उपकारच आहेत.

हा विचार मनात आला आणि मोठी साधनं करण्याच्या दृष्टीनं कमी पडणारी आपली कुवत पाहिली, तर याच युगात आपण आलो हे भाग्याचंच वाटेल आणि निराशा झटकून उत्साहानं आपण विधायक कर्तव्यपालनाला व नामाला लागू शकू.

*

# ८.

## अभ्यास न करता साधूकडे गेले म्हणजे त्यांना लाज वाटते.

- श्री सहस्रबुद्धे महाराज

सत्पुरुषांना त्यांच्याकडं आलेल्या जिवाच्या उद्धाराची आत्यंतिक तळमळ वाटते. त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. या जिवांना बोध व्हावा म्हणून प्रत्येक साधुपुरुष आपापल्या कार्यपद्धतीप्रमाणं समजावणं, आज्ञा देणं, वाचन-पारायण-अनुष्ठान करायला सांगणं, एखाद्या ग्रंथाचा अभ्यास करायला सांगणं, कुठल्या विशिष्ट यात्रा करणं, देव-साधू यांची दर्शनं घेणं-अशा विविध प्रकारे प्रगतीचा मार्ग शिष्यांना देत असतात.

ती ती गोष्ट सांगितल्यावर ती समजून घेणं, पुन्हा येताना त्यावर विचार करून येणं, काही करून यायला सांगितलेलं असल्यास ते साधन करून येणं, ते करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणं, त्यात काही शंका - अडचण आली असल्यास ती घेऊन येणं - अशा असंख्य प्रकारे साधूंनी सांगितलेल्या गोष्टींचा अभ्यास आपण दरम्यान करावा, अशी त्यांना रास्त अपेक्षा असते.

त्यातलं प्रत्येक साधन करणं किंवा ते ते साधन पूर्णच करून येणं असं जरी त्यांना अपेक्षित नसलं, तरी जसं , जेवढं, ज्या प्रमाणात तळमळीनं करणं शक्य असेल ते तरी आपण करावं आणि मगच त्यांच्याकडं जावं, इतकी तरी त्यांची माफक अपेक्षा राहाते. तीसुद्धा एवढ्यासाठीच की,

असं काही प्रत्यक्ष काम आपण केल्याशिवाय आपली प्रगती होणं शक्य नसतं आणि आपली प्रगती व्हावी एवढीच त्यांची तळमळ असते.

व्यवहारातल्या कुठल्याही साध्या शिक्षकानं सांगितलेला गृहपाठ आपण त्याच्याकडं परत जाताना करून जातो, तो करून न गेल्यास ते रागावतात, पुन्हा पुन्हा स्मरण देतात, संधी देतात, पण तो केल्याशिवाय आपली सुटका नसते. वेळी तसंच वागत राहिल्यास त्यांच्याकडं ते येऊ नका म्हणूनही सांगतात. ते सारं आपल्याला अपेक्षित असतं, पटतं, आपण करतोही.

ही तर साध्या लौकिक विद्येची किंवा लाभाची गोष्ट. तर उद्धारासारख्या दुष्कर कामात अभ्यासाची किती अपेक्षा आपण गृहीत धरायला हवी ? किंबहुना ती न केल्यास त्यांनी खरं तर आपल्याला कायमचं दार बंद केलं तरी त्यांचं बरोबरच ठरेल. पण इथंच 'संतांचं' मोठेपण आहे. आपण अभ्यास न करता त्यांच्याकडं असंख्य वेळा जातो, त्यांचं अंत:करण मोठं असल्यानं ते पुन्हा पुन्हा प्रेमळपणानं आपल्याला साधनं सांगतात-सुचवतात,आपल्याला दुखवणं टाळतात, पुन्हा उद्धाराचीच तळमळ धरतात. पण याचा अर्थ आपला त्यांना काहीच त्रास होत नसेल असं किंवा आपलं वागणं बरोबर आहे, असं गृहीत धरणं ही केवढी चूक ठरेल !

खरं तर या वचनात लक्षात आणून दिल्याप्रमाणं, आपण अभ्यास न केल्याची आपल्याऐवजी त्यांनाच लाज वाटते. ती गिळून ते दयार्द्र अंत:करणानं पुन्हा अभ्यास सांगतात याची आपल्याला खरी खंत वाटली व आपण प्रामाणिकपणे अभ्यासाला, प्रयत्नाला लागलो तर सत्पुरुषांच्या तळमळीचं सार्थक होईल अन् आपलाही उद्धार होईल.

*

# ९.

## जगात काम करणे कठीण आहेच, पण अनावश्यक कामांपासून दूर राहाणे त्याहीपेक्षा कठीण आहे.

- श्री निसर्गदत्त महाराज

सर्वसाधारणपणे कोणी माणूस कधी निरुद्योगीपणे आयुष्य घालवीत नाही. असंख्य कामं तो रोज हातावेगळी करीत असतो. प्रपंचाचा, देहाच्या मागण्यांचा, जगाचा रेटाच असा असतो की, त्याच्या आयुष्याची संध्याकाळ आली, तरी त्याची या कामांतून सुटका होत नाही. बरं तो करतो ती कामं एक तर बेसावधतेनं करीत असतो. काही वेळा सावध असला तरी तो करीत असलेली सर्वच कामं त्याला आवश्यक वाटतात. त्यामुळं ही कामं करण्याला आपल्याला पर्यायच नाही, अशी तो स्वत:चीच समजूत करून घेतो.

मग कधी तरी या साऱ्या कामांच्या रगाड्याला धक्का देणारा व पोकळी निर्माण करणारा एखादा दिवसही काहींच्या आयुष्यात उगवतो. कधी त्यांचे आयुष्याचे ठरवलेले व आजवर यशस्वी होत आलेले प्लॅन कोसळून जातील अशी घटना घडते - मग ते उमद्या मुलांचे अकाली मृत्यू असोत, धंद्यातल्या उलथापालथी असोत, मित्र-नातेवाईक-व्यावसायिक यांच्याकडून घडलेली घोर वंचना वा फसवणूक असो किंवा एखाद्या अगदी जवळच्या माणसाचा वियोग असो. काही कारणांनी हा रगाडा थांबतो. मग आढावा होतो. विषण्णता येते. आजवरच्या अविश्रांत

धावपळीच्या आणि कामांच्या आवश्यकतेविषयी - बरोबरपणाविषयी शंका येते. काहींना तिचं फोलपणही लक्षात येतं. मग दुसरीकडं मन लावायला जावं, तर तेही लागत नाही. आयुष्यात कधी शांत राहाण्याची, सद्ग्रंथ वाचायची, नाम घ्यायची, ध्यानाची सवय नसते. मग असं काही आवश्यक असलं तरी कसं करावं ते कळत नाही, केलं तरी मनाची ठेवण त्यात रमत नाही.

काहींच्या बाबतीत असंही होतं की, हीच कर्तृत्वाची कमान चढती राहाते, यशच यश असतं, काही मिळवायचंच उरत नाही आणि पुन्हा हीच पोकळी वेगळ्या वाटेनं समोर येते. काहींच्या आयुष्यात अपेक्षाच नसतात, संवेदनाशीलता नसते, थंडपणे येईल तसा दिवस ढकलण्यात आयुष्य जातं आणि अवचितपणे ही पोकळी समोर येते. पुढचा प्रवास वर सांगितला तसाच असतो.

मग लक्षात येतं की, माणसाच्या आयुष्याचं, त्याला मिळालेल्या दुर्मीळ संधीचं चीज करणारी अनेक महत्त्वाची कामं करायची राहून गेली. ही कामं म्हणजे मनुष्यजन्माचा हेतू शोधणं, तो साध्य करण्यासाठी प्रयत्न करणं, मनुष्याला स्थल-काल व त्या पलीकडं जाण्यासाठी जे भान, जी क्षमता दिली आहे तिचा उपयोग करून स्वत:चं व इतरांचं जीवन खऱ्या अर्थानं उच्चतर करणं, समाजाचं ऋण फेडण्यासाठी आवर्जून प्रयत्न करणं अशी अनेक आवश्यक कामं असतात. ती न केल्यानं स्वत:चं व समाजाचं अपरिमित नुकसान होतं.

या उलट स्वत:ला पोटापुरतं मिळालेलं असतानासुद्धा अधिक मिळवण्याच्या व संचयाच्या मागं लागणं, पोकळ डामडौल - मोठेपण यासाठी धडपडत राहाणं, अकारण वाचन-फिरणं-चर्चा-चिकित्सा-व्यवहार अशी असंख्य कामं माणूस आवश्यक समजून करीत राहतो. जे कुणी कधी या गोष्टी टाळायचा प्रयत्न करतात, त्यावेळी त्यांच्या हेही लक्षात

येतं की, आपल्यालाही आता अशा अनावश्यक हिंडण्याची -फिरण्याची- कामांची सवय झाली आहे. ती मोडणं कठीण आहे. या अनावश्यक कामांना नकार देण्यापेक्षा ती कामं करीत राहाणं सोपं वाटतं.

त्यात पुन्हा अशा अनावश्यक व निरर्थक काम करीत राहाणाऱ्यांची जगातली संख्या जास्त असते. अशा वेळी आपण ठरवलं तरी त्या माणसांच्या तावडीतून सुटणं ही एक सात्त्विक कसरत, धैर्य व कौशल्य असतं. पण मनुष्यजीवनाचं चीज करायला या सात्त्विक धैर्याची आत्यंतिक गरजही असते.

म्हणून आपल्या तथाकथित कामांतली अनावश्यक कामं हुडकून ठामपणे टाळली, इतकंच नव्हे तर आवश्यक कामांचीच निवड, सवय व करायचं धैर्य ठेवलं, तर ही पश्चात्तापाची पाळी येणार नाही आणि मानवी आयुष्याचं सार्थक होईल.

*

# १०.

## स्वत:च्या डोळ्यांनी पाहावे,
## स्वत:च्या कानांनी ऐकावे.

- स्वामी रामतीर्थ

वरवर पाहिलं तर यात सांगण्यासारखं काय आहे असाच विचार प्रथम मनात येईल. अनेक लोक अशी प्रतिक्रिया देऊन 'मोकळे'ही होतील. पण महापुरुष ज्यावेळी असं काही बोलतात तेव्हा त्यात खोल विचार करण्यासारखं तथ्य असतं, एवढं तरी गृहीत धरावं.

क्षणभर आपण आपला रोजचा व्यवहार पाहावा. त्यात आपण अनेक कृती करतो. अनेकांविषयी मतं देतो, ग्रह बाळगतो, दुरावतो, नावं ठेवतो, वेळी अनेकांशी जवळीक करतो, अनेकांना चांगलं म्हणतो, त्यांची स्तुती करतो. पण या साऱ्या कृतींमागं ज्या आपल्या स्वत:च्या एका घडणीवर आपण ही मतं ठरवतो - भले ती चांगली, वाईट काहीही असोत किंवा आपल्या कृती - मग त्या जवळ जाण्याच्या असोत - दूर जाण्याच्या असोत किंवा एखादी गोष्ट करण्याच्या असोत किंवा न करण्याच्या असोत - त्या स्वत:च्या अंतरंगाच्या घडणीवर हे सारं अवलंबून असतं, याचा आपण कधी विचार करतो का ?

ज्या कुटुंबात जन्माला आलो, ज्या पंथात, धर्मात जन्माला आलो, ज्या समाजात वाढलो, जसजशी माणसं महत्त्वाच्या टप्प्यावर आपल्याला भेटली, त्यांचे जे जे अनुभव आपल्याला आले - त्या साऱ्यावर मुख्यत्वानं

आपली ही घडण अवलंबून आहे ना ? की आपण स्वत:च्या डोळ्यांनी पाहून किंवा स्वत:च्या कानांनी ऐकून 'आपली मतं' ठरवीत आहोत ? अशा वेळी संदर्भ म्हणून आपण या घडणीचा आधार जरूर घेत असू,पण निर्णय करताना, मतं बनवताना, स्वत:च्या डोळ्यांचा-स्वत:च्या कानांचा म्हणजे अनुभवावर आधारलेल्या स्वतंत्र बुद्धीचा प्रामुख्यानं वापर आपण करतो आहोत का ?

आपलं आजवरचं आयुष्य पाहिलं, तर ते उलट इतरांच्या कानांनी ऐकण्यात व डोळ्यांनी पाहाण्यातच गेल्याचं लक्षात येईल. अशा घडणीवर आपण अनेकांना अकारण दूर लोटलं आहे, निंदा केल्या आहेत, दूषणं दिली आहेत. अशा नकारात्मक उद्योगात आयुष्याचे तासन्तास घालवले आहेत. याचा अर्थ जगात वाईट वा चुकीचं काही नसतंच किंवा इतरांचं काही ऐकूच नये असा नाही. पण आपली घडण स्वतंत्र असली, तर एक म्हणजे नकारात्मक कामं कमी होतात, योग्य - रास्त कृती वाढतात. दुसरं म्हणजे जितके हे अकारण किंवा पूर्वग्रहदूषित प्रभाव कमी होतात, तितकं आपलं मन शुद्ध, हलकं व कार्यक्षम होतं.

स्वत:च्या कानांनी ऐकणं, डोळ्यांनी पाहाणं हे 'मी'पणाचं द्योतक नाही.'वस्तुस्थिती'विषयी जास्तीत जास्त निरपेक्ष, नि:स्वार्थी, पूर्वग्रहमुक्त, नम्र, निकोप व विधायक दृष्टी मिळवण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न आहे. म्हणूनच तो प्रयत्न स्वागतार्ह आहे, हे खचितच लक्षात येईल.

*

# ११.

## रोग म्हणजे देवाच्या हातातील एक हत्यार होय. नुसता रोग काय करील ?

- श्री निंबरगी महाराज

कुठलंही आजारपण वा रोग याला सामोरं न जाता संपूर्ण आयुष्य पार पाडलेली माणसं आजच्या काळात तरी विरळाच आहेत. कुठल्या ना कुठल्या स्वरूपात लवकर वयात नाहीतर मध्यम किंवा उतारवयात रोगाचा सामना करावा लागणं बहुधा अपरिहार्य ठरतं. त्या त्या रोगाच्या तीव्रतेनुसार, योग्य सल्ला-उपचार यांच्या उपलब्धतेप्रमाणं, रोग्याच्या औषधंपथ्याच्या काटेकोर पाळणुकीप्रमाणं या रोगातून मुक्त होणं ठरतं. या सगळ्यात ढिलाई किंवा कुपथ्यं आली म्हणजे हा काळ आणखीनच लांबतो. त्यात रोग असाध्य असला तर मग सामान्य माणूस हातपायच गाळतो.

या साऱ्यात सर्वांत महत्त्वाचा आणखी एक घटक म्हणजे रोग्याची मन:स्थिती. तिच्यामुळं रोग निर्माण होण्यापासून, दूर व्हायला मदत होण्यापर्यंत सर्व घडत असतं. रोग असताना रखरख, स्वत:ला इतरांना त्रास, देवाला दोष देणं, उपचारांना अपेक्षित प्रतिसाद न मिळणं-अशा गोष्टी घडतात.

तर काहींच्या बाबतीत याउलट आनंदानं, तटस्थतेनं सहन करणं, सर्व उपचारांना न कंटाळता सामोरं जाणं आणि त्यामुळं उपचार अधिक यशस्वी होणं, इतरांना कमीत कमी त्रास असणं, वेळी सोसण्याचा आदर्श

निर्माण होणं -अशासारखी दोन्ही टोकाची - दु:खाची व आनंदाची - चित्रं कुठलाही रोग वाट्याला आला असता निर्माण होतात.ती तशी होणं, हे प्राधान्यानं या 'मन:स्थिती'च्या घटकावर अवलंबून असतं, हे फार क्वचित लक्षात घेतलं जातं.

किंबहुना हे जरी लक्षात आलं तरी आवश्यक ती विधायक मन:स्थिती मिळवायला व टिकवायला काय करावं लागेल याची अनेकांना कल्पनाही नसते. अनेक जण मन:पूर्वक प्रयत्नही करीत नाहीत. या प्रयत्नांतला एक महत्त्वाचा भाग म्हणजे रोगाकडं बघण्याची दृष्टी.

अशी एक दृष्टी देण्याचं महत्त्वाचं कार्य हे वचन करतं. या वचनानुसार रोगाकडं देवाच्या म्हणजे विश्वव्यवस्थेच्या हातातलं एक हत्यार म्हणून पाहावं. एखादं कोयत्यासारखं किंवा धारदार शस्त्रासारखं हत्यार आपल्याला इजा करताना प्रत्यक्ष दिसतं. तरी त्या शस्त्राला आपण दोष देत नाही. कारण स्वतंत्रपणे किंवा स्वेच्छेनं तो कोयता किंवा ते शस्त्र मुळात इजा करीत नसतं. ते उगारणारा किंवा वापरणारा कुणीतरी दुसरा असतो. त्याचा ते उगारण्यामागं काही हेतू असतो. तो हेतू आपल्या कर्मांशी निगडित असतो. तोच विचार थोडा पुढं जाऊन आपण रोगाच्या बाबतीत करण्याची गरज आहे. हा विचार जर केला तर आपण जसा कोयत्याला किंवा शस्त्राला दोष देत नाही तसाच तो रोगालाही देता येणार नाही, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.

मुळात शारीरिक रोग हे आपल्या स्वत:च्याच कुठल्या तरी आरोग्यनियमांचं उल्लंघन करण्याच्या कृतीचे परिणाम असतात. म्हणजे ती आपल्याच कर्माची जबाबदारी असते. मग त्यात विश्वव्यवस्थेनुसार तो रोग आनंदानं सोसून ही जबाबदारी पुरी करणं हेही आलं.

काही वेळेला आपल्याला असा रोग व्हावा अशी आपली चूक किंवा कृती कुठं दिसत नाही. अशा वेळी काही माणसांच्या सामूहिक

कर्मांचेही ते परिणाम असू शकतात, हे लक्षात आलं तरी दृष्टिकोन बदलतो. काही वेळा तर सकृतदर्शनी अकारण वाट्याला आलेले रोगसुद्धा नव्या ओळखी, जीवनक्रम, स्थान, ग्राम-बदल अशा काही उपकारक गोष्टी करून जातात. हे आणि असे अनेक दृष्टिकोन कळले की, लक्षात येतं की, कोणत्याही अर्थानं ते देवाच्या हातातलं एक हत्यारच आहे.

एवढं मनापासून पटलं, तर रोग सहन करतानासुद्धा चित्ताला एक प्रकारची शांतता व स्थैर्य येतं आणि आवश्यक ती विधायक आनंदी 'मन:स्थिती' मिळून जाते.

*

# १२.

बदली झाल्याने गैरसोय झाली असेल, परंतु प्रभुसत्ता असेल तसे घडणारच. अस्तु. अंतरातील देवाची बदली न झाली म्हणजे पुरे.

- श्री टेंबे स्वामी

बदली हा बऱ्याच नोकरदारांच्या आयुष्यातला महत्त्वाचा भाग होय. त्यातही खर्च वाढणं, घरं बदलणं, मुलांची शिक्षणं, नवं वातावरण, माणसं, नव्या जबाबदाऱ्या, कामं या साऱ्यांमुळं बदली ही साधारणपणे नकोशी व त्रासाची वाटणारी गोष्ट ठरते.

मुळात आधी हे सर्व घडतंच असं नाही. पण नोकरीतल्या मूळ करारात, अटींतच अनेकदा ही गोष्ट स्वीकारलेली असते. त्यात त्या त्या मालकाचे-व्यवस्थापनाचे उद्देश व गरजा असतात. अनेकदा ती गोष्ट अपरिहार्य किंवा उद्‌भवू शकणाऱ्या वा उद्‌भवलेल्या प्रश्नांवरचा मार्ग असतो. नोकरी नसताना तर एकदा नोकरी मिळू दे, मी कुठंही जायला, कुठलीही बदली स्वीकारायला तयार आहे, अशी आपली मन:स्थिती असते.

बदलीला कुरकुरणं किंवा तिला कुणामुळं तरी घडणारी गैरसोय मानणं-ही तशी सरळ विचार केला तरी स्वत:च्या सुरक्षिततेला व सुखाला धक्का लागू नये म्हणून काढलेली पळवाट असते. इतरांना मात्र असे धक्के द्यायला काय हरकत आहे, त्यांची बदली व्हावी म्हणून असे प्रयत्न करायलाही माणूस कमी करीत नाही.

मानवी स्वार्थामुळं घडणारे न्यायअन्याय सोडले, तर बदली म्हणजे केवळ दु:खदच गोष्ट असते असं नाही. अनेकदा त्या त्या ठिकाणी बदली मिळाल्यामुळं झालेले फायदे - वेगवेगळ्या प्रकारची नवी माणसं, नवं ज्ञान, संधी, विकास इत्यादी पाहून, बदली झाली ते बरं झालं,असं म्हणणारी माणसंही असत नाहीत का ? हे सारे विचार मनात आले, तर 'बदली'कडं पाहाण्याचा किंबहुना ती टाळण्याचा नकारात्मक दृष्टिकोन तरी बदलेल, स्वास्थ्य टिकेल व वाढेल.

मुळातच 'बदलां'मागं केवळ भौतिक कारणं नसतात. त्या त्या गावाचा, माणसांचा, आपापल्या कर्मांचा, भावी घटनांचा पाया म्हणून अशा महत्त्वाच्या गोष्टी विश्वव्यवस्थेकडून प्रभुसत्तेनं घडत असतात. आपल्याला कळत नाहीत म्हणून ही कारणं नसतातच असं नाही. अनेकदा नंतर त्या त्या बदलीचे विधायक अर्थ व परिणाम आपल्याला कळतातच ना ?

त्याचबरोबर दुसरं असं की, अशा कितीही भौतिक बदल्या झाल्या तरी त्या सर्व ठिकाणी जसं आपण स्वत: जातो व कायम असतो, तसंच आपल्या अंतरंगातला ईश्वर - जो या साऱ्याचा कर्ता आहे - तो कायम राखता आला, तर मग जी सुरक्षितता व स्थैर्य इथं आहे, तीच सुरक्षितता व स्थैर्य तिथंही असू शकतं, असा अनुभव येतो.

म्हणून त्या अंतरंगातल्या ईश्वराची बदली होणार नाही, म्हणजे तो कसा अंतरणार नाही, त्याचं स्मरण व सान्निध्य कसं निरंतर टिकून राहील याची काळजी केली, तर मग इतर बदलणाऱ्या व्यवस्था,स्थानं, माणसं या अशाश्वत गोष्टींवरचं लक्ष व त्रास कमी होऊ शकेल.

तसा एखाद्या 'बदली'पुरता हा विषय मर्यादित नसून आयुष्यात घडणाऱ्या अनेक 'बदलां'ना सामोरं जायला हा विचार तितकाच मदत करणारा आहे, हे लक्षात येईल.

एक नोकरदार सोडले तरी सर्वांना आपापल्या परिस्थितीत अनेक घटनांना सामोरं जावं लागतं. अनेकांना बाह्य यंत्रयुगामुळं-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळं, बाजारातल्या चढ-उतारांमुळं आपापले व्यवसाय बदलावे लागतात. कमी-जास्त भर देऊन करावे लागतात. मुलाबाळांची शिक्षणं, त्यांच्या नोकऱ्या, आपल्या निवृत्ती यांमुळंसुद्धा अनेकदा गावंही बदलावी लागतात. गैरसोयी-नव्या गरजा यामुळं बिऱ्हाडं-घरं बदलावी लागतात. तसंच माणसं, वियोग, संयोग अशा अनेक बदलांना खूप वेळा सामोरं जावं लागतं. त्या वेळीसुद्धा ही दृष्टी उपयोगी पडेल, चित्ताचं स्थैर्य टिकवील.

मूळ, स्थिर, शाश्वत व आपल्या बरोबर या सर्व बदलांत सदैव राहाणाऱ्या अंतरीच्या भगवंताचं भान या वचनाच्या चिंतनामुळं वाढेल. त्यामुळं आपलं स्वास्थ्य टिकेल.

*

# १३.

## कर्मठ 'उपासने'चेही 'कर्म' करतो.
## भक्त 'कर्मा'चीही 'उपासना'बनवतो.

- श्री विनोबा

आपल्या जीवनाचा अंतिम कर्ता व या विराट सृष्टीचा नियामक म्हणून कुणी 'भगवंत' नावाची शक्ती आहे. तिचं स्मरण व्हावं, राहावं, तिचं म्हणजेच व्यापकाचं भान राहून आपली कर्मं घडावी यासाठी आपण आपापल्या परीनं अवलंबलेला मार्ग म्हणजे 'उपासना' होय.

त्या मार्गामुळं, त्याच्या नित्य आचरणामुळं भगवंताचं स्मरण तर होतंच, पण त्याच बरोबर आपण भगवंताच्या जवळ असल्याचं किंवा भगवंत आपल्याजवळ असल्याची संजीवक व प्रेरक जाणीवही सातत्यानं ताजी राहाते. तिचा परिणाम म्हणून स्वाभाविकपणे दुर्वासना कमी होणं, कर्मांची निवड, त्यांची गुणवत्ता - प्रत बदलणं, ती अधिकाधिक सात्त्विक व स्वहित-परहित साधणारी होणं - असं घडत जाऊन माणसाचं जीवन खऱ्या अर्थानं रसमय, उच्चतर व आनंदी बनतं.

आता या उपासनेच्या नित्य आचारासाठी नित्य किंवा नैमित्तिकपणे काही मूर्ती-फोटो-प्रतीक-पूजाअर्चा-विधी-मंत्र-शब्द साहित्य, ते करण्यासाठी शुचिर्भूतता, विशिष्ट वेळ अशा अनेक गोष्टी ओघानंच येतात. आपापल्या परिस्थितीनुसार त्याची निवड केली जाते. तरीही या 'उपासने'ला कर्माचं - प्रत्यक्ष कृतींचं स्वरूप येणं अपरिहार्य असतं.

पण माणूस आयुष्यभर कर्माला एवढा सरावलेला असतो की, वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक कामं जशी सरावानं फारसं मन न घालता हातावेगळी करावी, तशी कळा त्याच्या 'उपासने'ला येते. मग उपासनेचा 'भगवंताच्या जाणिवे'चा व त्याच्या स्वतःवरच्या 'परिणामां'चा आत्मा हरवतो. ते एका विशिष्ट वेळी उरकायचं काम ठरतं. त्यातलं बाह्यांग कर्मांच्या हौसेमुळं वाढत जातं व साहजिकच ते कर्म उपासना म्हणून निरुपयोगी ठरतं.

अशा तऱ्हेनं आत्मा हरवलेली कर्मकांडं करणारा 'कर्मठ' माणूस एवढं 'उपासने'सारखं परिणामकारक व जिवंत कर्म कुठलाही परिणाम न घडवणारं निर्जीव प्रापंचिक कर्म बनवून टाकतो आणि उलट 'उपासना' वर्षानुवर्षं काटेकोरपणे करीत असल्याच्या अहंकारात मात्र सापडतो.

म्हणून पूजा उरकल्या जातात. वेळी उगीचच अनेकांना त्रास निर्माण करून काटेकोरपणे केल्याही जातात. वर्षानुवर्षं स्वतःहाच्या स्वभावात कोणताही विधायक बदल न घडता चार चार धामांच्या यात्राही केल्या जातात. उलट झेपत नसताना वेळी इतरांना अडचणीत टाकूनही त्या घडवल्या जातात. इतरांना रोज त्रास होईल एवढ्या नियमितपणे आरत्या दणकावून म्हटल्या जातात. या साऱ्यांचा मूळ हेतू - आपल्या अंतरंगातला भगवंत जागा करून - जागा ठेवून त्यामुळं आपल्या हातून योग्य, सात्त्विक कृती घडण्याचा - तो या कर्मठ उपासनेत कधीच हरवून जातो. मग कर्मठ उपासनेचंही कर्म कसं बनवतो हे लक्षात येऊन जातं.

खरा भक्त हाही कर्ममार्गीच असतो. पण तो मुळातच भगवंताचं भान ठेवून असतो. ते टिकवण्यासाठी तो सावध असतो. त्यासाठी काही लौकिक 'उपासना'ही तो करतो. पण लौकिक उपासनेच्या कर्माच्या मर्यादाही त्याला माहीत असतात.

त्यामुळं त्याच्या वाट्याला आलेली कर्मंच तो अशा दृष्टीनं आणि

तन्मयतेनं करतो की, वेगळी कर्मकांडात्मक उपासना कमीच लागावी. लौकिक कर्म कुठलीही असोत ती भगवंतानं दिलेली आहेत, त्याच्यासाठी करायची आहेत, त्यामुळं ती उत्तमात उत्तम करायची आहेत व त्याला अर्पण करण्यासाठी करायची आहेत. ती पुरी होताच भगवंताला देऊन स्वत: निरपेक्षतेनं त्यातून बाजूलाही व्हायचं आहे - हे सारं लक्षात ठेवून तो वैयक्तिक, व्यावसायिक - सर्व कर्मं करतो.

त्यामुळं अशा नित्याच्या साऱ्या कर्मालाच 'उपासने'ची योग्यता प्राप्त होते. याचं मर्म लक्षात घेऊन असा 'खरा भक्त' कसं होता येईल याचा प्रयत्न केला तर हिताचं होईल.

*

# १४.

## ज्ञानेश्वरी वाचल्याशिवाय मरू नका.

### - पू. मामासाहेब दांडेकर

एखादी गोष्ट आपल्याजवळ असली किंवा सहज उपलब्ध झाली म्हणजे तिचं मोल कळत नाही. हा माणसाचा स्वभाव आपल्याला खूप वेळा अनुभवायला आला असेल. आपल्या साध्या देहाची गोष्ट घ्या. तो आपल्याला सहज मिळालेला आहे व आपल्या जवळही कायम आहे. ही देहाची यंत्रणा माणसाला आयुष्यभर अनंत प्रकारे जीवनव्यवहार चालवण्यासाठी, शब्दशः श्वासागणिक, अविरत उपयोगी पडत असते. या सर्वांत जवळच्या व सहज मिळालेल्या 'देहयंत्रणे'बद्दल किती माणसं सावध असतील ?

नुसताच जीवनव्यवहार नव्हे तर समाजसेवा, लोकोद्धार, आत्मोद्धार इतक्या सर्व महत्त्वाच्या बाबतीत उपयोगी पडणारी देह ही अपूर्व यंत्रणा आहे. पण ती इतकी अनायास मिळते की, तिचं मोल ओळखणारे, तिची अपरिहार्यता कळणारे, अमूल्यता जाणून ती जपून वापरणारे, तिचं सार्थक व्हावं म्हणून जाणीवपूर्वक धडपडणारे किती असतील ?

तशीच काहीशी अवस्था आपल्या मराठी माणसाची 'ज्ञानेश्वरी'बद्दलची किंवा त्या अर्थानं गाथेबद्दलची नाही का ? मुळात आम्हाला त्यातलं काही कळत नाही, हे काहीही न वाचता किंवा काही कळून न घेताच म्हणणारे जास्त आढळतात. उरलेल्या लोकांत हा एक चांगला ग्रंथ आहे म्हणून नुसतं सांगणारेच जास्त आढळतात. त्यांतले

काही आपल्याकडं तो ग्रंथ आहे म्हणून सांगण्यासाठी तो ग्रंथ घेऊन ठेवतात.

त्यातले बरेच लोक निवृत्तीनंतर किंवा सवडीच्या वेळात तो वाचण्याचा संकल्प असल्याचं सांगतात.त्यातही अनेकांचा हा संकल्प तडीला जात नाही. या साऱ्यांतून उरणारे-पारायण, अभ्यास, समजून घेणं आणि आचरण करणं हे करणारे उत्तरोत्तर किती कमी असतील !

याचं फार मोठं कारण असं की, ती आपल्याला तरी मातृभाषेत, सहज, जन्मत:च मिळाली आहे. ज्यांनी कुणी ती वाचून सात्त्विक,आनंदी जीवनं घडवली, अशा सामान्य - असामान्य व्यक्तींच्या सान्निध्यामुळं खूप चांगल्या टिकलेल्या समाजात आपण सहजच जन्माला आलो, वाढलो, जगलो. त्यामुळं 'ज्ञानेश्वरी'चं मोल ओळखणं आणि उपयोग करणं विसरून जायला होतं.

वास्तविक माणसाला कसं जगावं, निसर्गाकडून काय शिकावं, कर्तव्य कशा भावनेनं व का करावं, भगवंताची सर्वांना शक्य असलेली प्राप्ती म्हणजेच निरपेक्ष आनंद याच जन्मी कसा मिळवावा - द्यावा, यांतल्या अडीअडचणी-खाचखळगे-मार्ग कोणते ते हळुवारपणानं आणि आईच्या मायेनं सांगणारा अलौकिक, जागतिक कीर्तीचा कालातीत ग्रंथ आपल्या मराठीत असावा, तो समजावून देणारे अनेक ग्रंथ व थोर माणसं मराठीत असावीत हे आपलं परमभाग्य नाही का ?

कदाचित आपल्याला हे माहीतही नसेल की, या मराठीतल्या ज्ञानेश्वरीचं मोल ओळखून इतर भाषेत तिचे अनुवाद किंवा भावार्थ तरी वाचायला मिळावा म्हणून हिंदी-इंग्रजीपासून असंख्य भाषेतले लोक अक्षरश: धडपडत आहेत. जे, जशा स्वरूपात त्यांना मिळतं आहे त्यावरून या मूळ अनमोल ग्रंथाच्या कल्पनेनंसुद्धा असे इतर भाषिक लोक स्तिमित होत आहेत. अशा वेळी आपण मराठी असून मूळ ज्ञानेश्वरी

थोड्या प्रयत्नानं का होईना समजून घेऊ शकतो हे किती भाग्याचं आहे, याची कल्पनाच केलेली बरी.

म्हणून नि:स्वार्थ व हितबुद्धीनं सांगणाऱ्या पूज्य मामांसारख्यांचा एका ओळीचा, अत्यंत तळमळीचा व आपलं स्वत:चंच कल्याण साधणारा आदेश म्हणून तरी मराठी माणसानं हे काम सबबीच्या व बिनखात्रीच्या उद्यावर न ढकलता 'आज'च करावं, हे आपल्या 'मराठीपणा'चं चीज व स्वत:चा उद्धार करणारं ठरेल, हे खचितच.

*

# १५.

आपण पूर्वी काय होतो, याचा विचार करू नका. आपल्याला काय व्हायचे आहे याचाच फक्त विचार करा. म्हणजे तुमची निश्चितपणे प्रगती होईल.

- श्री माताजी (अरविंदाश्रम)

सावधपणानं जगणाऱ्या प्रत्येक माणसाला आपली प्रगती व्हावी असं वाटतं. मग ती प्रगती भौतिक असो वा आध्यात्मिक. मनुष्य जागा नसेल तर आपण कसे आहोत, कसं व्हावं हे भानच त्याला नसतं. मग तो बेसावधपणे, दैनंदिन गरजा पुऱ्या करीत करीत पशुवत् जगून एक दिवशी मरून जातो - ना स्वत:चा विचार - प्रगती, ना इतरांचा विचार - प्रगती. पण बरीच माणसं निदान स्वत:च्या निकृष्ट ऐहिक जीवनाची जाणीव होऊन अधिक शिक्षण-मोठी नोकरी-जास्त पैसा-खूप माणसं-घरंदारं अशा ऐहिक प्रगतीसाठी तरी प्रयत्नशील असतात.

काही माणसं हे सारं करतात, पण त्या साऱ्याची क्षणिकता, फोलपणा, मर्यादा हे सारं लक्षात येऊन खरी जागी किंवा सावध होतात. ती स्वत:चं अंतर्याम तपासतात, मनाची बद्धता-क्षुद्रता, असमाधानाची मूळ कारणं शोधतात आणि ते कसं बदलता येईल याचे संतसत्पुरुषांनी शोधलेले अनुभवसिद्ध उपाय व मार्ग पाहातात, चालतात. त्याबाबतीत प्रगतही होतात. स्वत: उद्धरतात वेळी इतरांचाही उद्धार करतात.

नुसत्या ऐहिकदृष्ट्या समृद्ध वा प्रगत होणाऱ्या माणसांपेक्षा अशी उद्धरलेली माणसं अर्थातच मानवी इतिहासावर, संस्कृतीवर प्रभावी, दीर्घकाळ टिकणारा किंबहुना न पुसणारा ठसा उमटवून जातात.

ही मानवी प्रगती ऐहिक असो वा पारमार्थिक-आत्मिक असो, तिच्यात वाटचाल असते, एक प्रकारची साधना असते, सातत्य असतं. ते न टिकलं तर अर्थातच वाटचाल थांबते, प्रगती पूर्ण होत नाही. या सातत्यात महत्त्वाचा अडथळा कुठला असेल तर तो नकारात्मक विचार, निराशा, भूतकाळातल्या अप्रिय आठवणी - घटना, कृती यांचं चिंतन होण्याचा. अशा नकारात्मक विचारानं - भले त्या घटना सत्य असोत - आजचा प्रगतीसाठी उपयोगी पडणारा उत्तम दिवस वाया जातो. मनाला नैराश्य आल्यानं उत्साह कमी होतो. आजची कार्यशीलता व प्रगतीची गती मंदावते. भूतकाळात भले आपण चुकीचे वागलो असू,अनादर्श असू - त्याचा विचार आज करण्यानं तेही बदलत नाही आणि आजच्या कामालाही उपयोग होत नाही.

अशा वेळी इथं म्हटल्याप्रमाणं आपलं आता जे आदर्श होण्याचं ठरलं आहे, त्यावर विचार केला तर उत्साहानं कामाला लागू. आदर्शांचं-ध्येयाचं चिंतन झाल्यानं ते ध्येय पक्कंही होत राहील, स्मरत राहील, प्रेरणा देत राहील, त्यासाठी लागणारी चिकाटी टिकेल - आपल्या क्षमतांचा पूर्ण वापर होईल, आवश्यक प्रयत्न घडतील. मग ती अपेक्षित प्रगती आपसूकच घडेल.

फक्त त्यासाठी नकळत होणारे भूतकाळातले व आपल्या अप्रगत पूर्वायुष्याचे विचार सावध होऊन वेळीच थांबवायला हवे.

*

# १६.

# दु:ख ही शोधासाठी हाक असते.

- श्री निसर्गदत्त महाराज

माणसाला दु:ख अपरिचित नाही. माणूस कितीही सुखी दिसला, वाटला तरी त्याला दु:खाची सोबत टाळता येत नाही. कुणी दाखवीत सुटतो, कुणाचं दिसतं, कुणी लपवतो, कुणी नाकारतो, कुणी याचा विचार करीत नाही,इतकंच ! शरीरदु:ख तर कधी ना कधी किंवा वारंवार माणसाला सतावीत असतं.

मानसिक दु:खाची तर व्याप्ती एवढी मोठी आहे की, राजापासून रंकापर्यंत, धडधाकट माणसापासून रोगी, आजाऱ्यापर्यंत आणि सामान्य प्रापंचिकापासून असामान्य वाटणाऱ्या पारमार्थिकांपर्यंत कुणी त्यातून सुटत नाही, हे खरं.

याबाबतीत एक गोष्ट विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. माणूस शारीरिक दु:खाची त्यामानानं लगेच दखल घेतो. संबंधित डॉक्टर,वैद्य यांच्याकडं जातो, वेदनेवर उपचार-औषध-गोळी घेतो. शरीरदु:खाच्या उपायावरच्या तज्ज्ञांच्या साहाय्यानं का होईना पण शरीरदु:खाच्या कारणांपर्यंत जायचा प्रयत्न करतो. कारण या महत्त्वाच्या वचनात म्हटल्याप्रमाणं 'दु:ख' ही त्याची योग्य ती दखल घ्यावी, त्याच्या कारणांचा शोध घ्यावा, ती कारणं दूर करण्याचे लवकरात लवकर प्रयत्न करावेत यासाठी निसर्गयंत्रणेची एक प्रकारची 'सूचना' किंवा 'हाक' असते. अर्थात हे आपल्याला या शब्दांत माहीत असेल किंवा नसेल.

पण हेही लक्षात घेण्यासारखं आहे की, ज्या तत्परतेनं मनुष्य शारीरिक दु:खाची दखल घेतो, त्या तत्परतेनं तो मानसिक दु:खाची दखल घेत नाही. इतकंच नव्हे तर ती मुळात मान्य करण्यालाच तो तयार नसतो. त्यांच्या बाबतीतही कारणांचा शोध घेण्याची गरज आहे, हेही तो स्वीकारायला तयार नसतो. वास्तविक निराशा, विषण्णता,उद्वेग, चिंता, काळजी -अशा असंख्य मानसिक दु:खांना त्याला पदोपदी सामोरं जावं लागत असतं. शरीरदु:खापेक्षा मानसिक दु:खांची त्रासदायकता, प्रमाण, वारंवारता खूप मोठी आहे.

अशा वेळी शोधाची गरज जास्त आहे. अनेकदा तर मानसिक दु:खं लक्ष दिली गेली नाहीत किंवा दूर केली गेली नाहीत, तर गंभीर शारीरिक आजारात परिणत होतात, हेही आपण पाहतो.

यासाठी आपल्याला होणाऱ्या कुठल्याही दु:खाकडं शरीराची किंवा मनाची एक हाक म्हणून पाहिलं तर वेळीच त्याचा शोध घेतला जाईल. मानसिक दु:ख दूर करण्याचेही संतप्रणीत मार्ग गवसतील, शरीरदु:खासारखी तीही दु:खं, त्यामुळं होणारी मानसिक व पुढं होणारी शारीरिक शक्तीची हानी टळेल, आनंद मिळेल, मिळाला असेल तर त्यात येऊ शकणारा विक्षेप टळेल.

दु:ख अमान्य करून, दुर्लक्षित करून, प्रलंबित ठेवून, टाळून काहीच साध्य होणार नाही. फक्त त्यासाठी दु:ख ही एक हाक आहे जिला वेळीच प्रतिसाद द्यायची गरज आहे, एवढं ध्यानी घेतलं तरी खूप होईल.

*

# १७.

# माणसाने ऑर्डिनरी राहावे.

## - श्री सहस्रबुद्धे महाराज

सदैव टापटिपीची व विशेषत: पोषाखाची काळजी घेणाऱ्यांना उद्देशून हे वाक्य मुळात वापरलं आहे. त्या अर्थानं ते प्रासंगिक असलं तरी अर्थगर्भ आहे, इतकंच नव्हे, तर ते अनेक बाबतीत लागू आहे.

अजागळपणा वेगळा, स्वच्छता-शुद्धता वेगळी आणि वस्त्रांचं शौकीन असणं वेगळं. काही प्रसंगविशेषी किंवा कार्यालयात पोषाखाची योग्य ती काळजी घेणं, हे जरी आवश्यक असलं तरी गुरुघरी जाताना, देवाला जाताना भपकेबाज, मुद्दाम लक्ष वेधून घेणारा, स्वत:चं लौकिक मोठेपण दाखवणारा पोषाख करणं हे आवश्यक नसतं. उलट ते माणसांचा अहंभाव तरी दाखवतं, नाहीतर बेसावधता तरी. अशा वेळी माणसाचे हे स्वभावदोष दूर व्हावेत म्हणून 'साधं राहावं' 'ऑर्डिनरी राहावं' असं सत्पुरुष सुचवतात.

या ठिकाणी 'ऑर्डिनरी'असा शब्द वापरला असला, तरी तो कनिष्ठ किंवा निकृष्ट दर्जाचा अशा नकारात्मक अर्थाचा नाही. माणसाची ध्येयं उत्तम असावीत, त्याच्या ठिकाणी उत्तमत्व, श्रेष्ठत्व जरूर असावं, त्यानं त्या अर्थानं 'एक्स्ट्रा-ऑर्डिनरी - विशेष गुणवान' ही अवश्य असावं. त्यासाठी प्रयत्नशील जरूर असावं, असंच संतांना वाटतं. हे या वाक्याचा अधिक अर्थ पाहाण्यापूर्वी स्पष्ट केलेलं बरं.

कारण खरे संत तर उलट 'उत्कृष्टातलं उत्कृष्ट' असं जे 'देवत्व'

- 'सर्वश्रेष्ठ एक्स्ट्रा-ऑर्डिनरीपण' आहे, ते मिळवतात, टिकवतात. तरीही ते 'ऑर्डिनरी' राहातात व राहायला सांगतात. यांतला फरक व असं करण्याची गरज लक्षात घ्यावी. ते 'उत्तमात उत्तम' असतातच, पण 'साध्यात साधं' राहातात किंवा सर्वांबरोबर राहातात. म्हणजेच अंगच्या गुणवत्तेमुळं, श्रेष्ठत्वामुळं ते कुठला अहंभावही होऊ देत नाहीत आणि त्या श्रेष्ठत्वाचं कुठलं बाह्य प्रदर्शनही करीत नाहीत.

म्हणूनच हे वचन नुसत्या पोषाखीपणाला लागू नसून इतर अनेक बाबतीतल्या बाह्य देखाव्यांना व उथळपणांना लागू आहे. लौकिक परिस्थितीमुळं किंवा काही साधनेमुळं कुणाकडं श्रेष्ठत्व आलं की, त्या बरोबर त्याच्या ठिकाणी एक सूक्ष्म अहंकारही येतो.

आपण कुणी वेगळे आहोत, इतरांपेक्षा कुठल्या तरी बाबतीत श्रेष्ठ आहोत, इतकंच नाही, तर ते तथाकथित श्रेष्ठपण, वेगळेपण आपण जपावं, इतरांना सांगावं, इतरांच्या ते लक्षात यावं, त्यांनी त्यानुसार आपल्याला वागवावं - असं वाटू लागतं. मग या अपेक्षा वाढत जाऊन अहंकार बळकट होतो.

अनेकदा तर लौकिक श्रेष्ठत्वही कालांतरानं जातं किंवा काय थोडीफार घडलेली साधना असेल तर तीही घडत नाहीशी होते आणि नुसताच अहंभाव राहून माणसाची अधोगती झालेली दिसते.

स्वत:चं मोठेपण दाखवण्यात आणखी एक नुकसानही नकळत होतं. स्वत:चं वेगळेपण, मोठेपण याकडं किंवा ते लोकांच्या लक्षात यावं याकडं स्वत:चं लक्ष वेधलं जातं आणि मग आपोआपच जगाकडचं लक्ष कमी होतं. जगात हेच काय याहीपेक्षा मोठेपण असलेले लोक आहेत हे लक्षात येत नाही, त्यांचं मोठेपण लक्षात येत नाही. त्या पार्श्वभूमीवर आपल्याकडं काहीच नाही हेही लक्षात येत नाही. त्यामुळं परिणामी नुकसान आपलंच होतं.

म्हणून आतून लौकिक व पारमार्थिक कुठलंही मोठेपण सुदैवानं आलं असेल किंवा मिळवता आलं असेल तर जरूर असू द्यावं, मिळवावं, चांगल्या अर्थानं वाढवावं. पण बाह्यात्कारी अत्यंत साधं, नम्र, सर्वांसारखं राहून आपलं कुठं वेगळेपण दिसणार नाही असं ऑर्डिनरी राहावं, हे हिताचं होय.

असं राहाता आलं तर हे अहंभावाचे धोकेही टळतील, अकारण मानमान्यतेचे - लौकिक मोठेपणाचे खऱ्या प्रगतीला येणारे अडथळेही टळतील, खरं मोठेपण टिकेल, वाढेल.

*

# १८.

धनधान्यपुत्रप्राप्तीचे
की संत साधने होत ।
याचसाठी का संतांनी
सांडिले सर्व गणगोत ?

- श्री गुप्ते महाराज

माणसं संतांकडं जातात. प्रत्यक्ष देहानं संत असतील, तर ते जिथं येतील - असतील तिथं जातात. देहानं नसतील, तर त्यांची स्मृतिस्थानं-समाधी, छायाचित्रं, मंदिरं, पुतळे - अशा ज्या रूपानं त्यांची स्मृती ठेवली असेल त्या त्या ठिकाणी जातात. अशा स्थानी अनेकदा चांगलं व शांत वातावरण असतं. त्याचा लाभ दर्शनाला येणाऱ्यानं स्वतः शांत, तटस्थ, निर्विचार होण्यासाठी घ्यावा, यासाठी ही वातावरणं अत्यंत अनुकूल असतात.

पण अशा भूमिकेनं संतांकडं किंवा त्यांच्या स्थानांकडं जाणारे किती लोक असतील ? संत 'संत' का झाले, कसे झाले, त्यांना त्यांच्याकडं कोण यावंसं वाटतं, कशासाठी यावंसं वाटतं, त्यांना काय दिलेलं आवडतं, त्यांना काय द्यायला आवडतं - हे सारे विचार संतांकडं जाताना करण्यासारखे नाहीत का ?

लौकिक व्यवहारात जरी एखाद्या माणसाला आपण भेटायला जाणार असू तर काही विचार आपण नकळत करतो, इतकंच नव्हे तर

त्यानुसार वागतोच ना ? त्यांना सोयीच्या वेळी जातो, त्यांची स्तुती, आदर करतो, त्यांना आवडणारी वस्तू देतो, आपलं काम सांगतो, शक्य असल्यास ते करून घेतो - हा व्यवहार तरी आपण एरवी पाळतोच व त्याचा लाभही होत असतो.

पण अशा एखाद्या लौकिक सत्ताधारी वा महत्त्वाच्या व्यक्तीकडं जावं तसे अनेक जण संतांकडं जाताना दिसतात. लौकिक व्यवहारात करावे तसे विचार करतात. संतांशी गोड बोलून, एखादी व्यावहारिक वस्तू देऊन त्यांना खूष करण्याचा प्रयत्न करतात.

त्यांना वाटतं की, यानं खूष होऊन इतर सामान्य माणसांसारखं आता आपल्याला हव्या असलेल्या पैसा, नोकरी, लग्न, मुलबाळं, आजारावर औषधं, कोर्टकचेरीची कामं - अशा अगणित लौकिक गोष्टी ते आता आपल्याला देतील, त्यांनी द्याव्यात अशी अपेक्षा बाळगतात, न दिल्यास नाराजही होतात.

व्यवहारात एखाद्या वस्तूच्या किमतीच्या प्रमाणात पैसे मोजावे, तसा देवाशी किंवा गुरूंशी सौदाही करायचा प्रयत्न करतात. वास्तविक या गोष्टी मुळात प्रयत्नाधीन, प्रारब्धाधीन, अपूर्ण व नश्वर. यासाठी योग्य प्रयत्न करून फळ भगवंतावर सोडून देणं आणि परिणाम आनंदानं स्वीकारणं हा खरा मार्ग नाही का ?

संतांकडं व्यावहारिक गोष्टी मागू नयेत, कारण संतांनी मुळात या गोष्टींचं नश्वरपण ओळखलं, त्यांचा त्याग केला आणि शुद्ध आनंदाच्या वा भगवंताच्या प्राप्तीसाठी लौकिकातल्या हालअपेष्टा सोसल्या. त्या तपश्चर्येतून त्यांनी जो अलौकिक आनंद मिळवला तो द्यायला, त्याचा मार्ग सांगायला, लौकिक गोष्टींचं फोलपण समजून द्यायला ते तत्पर असताना त्यांना आपल्या आधी सांगितलेल्या साऱ्या स्वार्थी-लौकिक मागण्या किती खेद उत्पन्न करीत असतील ?

आपली दुःखं आपुलकीनं संतांना सांगावीशी वाटणं, हे एक वेळ समजू शकतं. पण त्यांच्याशी सौदा करून नश्वर गोष्ट मागण्यात किंवा ते जे शाश्वत सुख देऊ इच्छितात, ते न घेण्यात आपलंच नुकसान होत असतं. मात्र विचार केला तरच हे लक्षात येऊ शकेल. विशेषतः देहात असताना संतांना वाटणारी तळमळ, होणारा उद्वेग, त्रास तर आपण विशेषच समजू शकू. जे संत भगवंतप्राप्तीसाठी स्वतः सर्व ऐहिक सुखोपभोगांचा त्याग करतात, वेळी खडतर शरीरकष्ट सोसतात, आप्तेष्टांचा रोष पत्करतात व उदात्त जीवन जगतात त्यांच्याकडं जाऊन शांत-निर्मळ-प्रसन्न जीवन शिकणं आणि भगवंतमय अलौकिक जीवनाची विद्या मागणं हे खरं औचित्याचं आहे.

ते त्यांनाही आनंदित करणारं ठरेल, त्यांच्या त्यागी जीवनाचं चीज करणारं ठरेल नाही का ? यात त्यांच्या त्या समाधिस्थानाचं, मंदिराचं, स्मृतिस्थानांच्या असण्याचंही सार्थक आहे आणि आपलंही कल्याण आहे. देहधारी गुरूंच्या बाबतीत तर हा अनुभव विशेषत्वानं येऊ शकतो.

पण त्यासाठी एका संतांच्याच या वचनामागची तळमळ आपण वेळीच समजून घ्यायला हवी ना ?

*

# १९.

## भगवंताबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे अगदी प्रसन्न राहाणे.

- श्री माताजी (अरविंदाश्रम)

आपल्यावर असलेल्या उपकारांची किंवा आपल्याला मिळालेल्या गोष्टींची जाणीव म्हणजे कृतज्ञता होय. अर्थातच हे उपकार करणारा, या गोष्टी देणारा कुणी कर्ता, दाता असतोच. कितीही वैज्ञानिक व तार्किक दृष्टीनं पाहिलं, तरी कुठल्याही कार्याला कर्ता असल्याशिवाय कार्य घडत नाही. तो कर्ता किंवा त्या कार्याचं कारण काहीही असो, कशाही स्वरूपाचं असो, ते आपल्याला कळणारं असो किंवा आपल्या आकलनक्षमतेच्या बाहेरचं असो.

आपल्या आयुष्यात आपल्याला मिळालेल्या, हरक्षणी उपयोगी पडणाऱ्या, अर्तक्यपणे चालणाऱ्या, विलक्षण क्षमतेच्या 'देहयंत्रणे'पासून विराट अनंत निसर्गविश्वापर्यंत सर्व गोष्टींनी आपलं आयुष्य घडतं, चालतं, तडीला जातं. त्यामुळं त्या साऱ्याचा कर्ता म्हणून सुज्ञ लोक 'भगवंत' मानतात. आपल्या आपल्या परीनं त्याच्याविषयी कृतज्ञ राहाण्याचा प्रयत्न करतात.

वास्तविक आपण अशी काही कृपा आपल्यावर व्हावी असं कोणतं दृश्य कर्तृत्व केलेलं नसतानाही ही पंचमहाभूतं देहाच्या स्वरूपात आपल्याठायी वास करतात. कारण देह पाच महाभूतांच्या घटकांचा बनलेला असतो.

ही महाभूतं उलट प्रतिक्षणी आपलीच सेवा करतात, आपलं जीवन आकाराला यावं, पूर्णत्वाला जावं म्हणून कार्यशील राहातात, हे लक्षात आलं, तर अद्‌भुतही वाटेल आणि आपण त्याची परतफेड कशी करावी याचा प्रश्न पडेल.

पण दुर्दैवानं एवढा सारासार व थोडा सूक्ष्म विचार करणारे व भगवंताच्या या कृपेबद्दल जागरूक असणारे लोक कमी आढळतात. अर्थात जे कुणी जागरूक नाहीत, त्यांचा इथं खोल विचार करायचं कारणही नाही. जे कुणी जागरूक असतात, भगवंताच्या कृपेची जाणीव, कृतज्ञता बाळगतात ते काय करतात ते पाहाणं आवश्यक आहे. असे लोकही नुसतीच जागरूकता दाखवतात.

कृतज्ञतेची कृती करणारे कमीच. ही कृतज्ञतेची कृती करणारे जे असतात, त्यातही भगवंताचे नुसते आभार मानणारे, स्तुतिस्तोत्रं गाणारे, ही कृतज्ञता इतरांपुढं डोळे भरून सांगणारेच जास्त. या पार्श्वभूमीवर कृतज्ञतेची खरी उत्तम अभिव्यक्ती वा कृती कोणती हे या वचनात कळतं. आपल्या जीवनात आपण रास्त कृती केल्यानंतर घडणाऱ्या सर्व घटनांत आपण प्रसन्न राहाणं, ही ती खरी कृती होय.

कारण जर भगवंतच मूळ कर्ता आहे, तर आपल्याला आवडणारे प्रिय प्रसंग तो घडवतो, तेव्हा आपल्याला स्वाभाविकपणे कृतज्ञता वाटते. पण इतर शेकडो अप्रिय प्रसंगही तोच कृपाळूपणे घडवीत असतो. अशा वेळी भगवंताची, त्याच्या अंतिम सत्तेची तितकीच आठवण, जाणीव व कृतज्ञता राहाणं हे अत्यंत गरजेचं व न्याय्य आहे.

त्यामध्ये स्वार्थाला मुरड घालण्याची सवय होते. सतत स्वसुखाची अपेक्षा बाळगण्याची सवयही मोडते. एखादी घटना आपल्याला अप्रिय असली, तरी ती इतर कुणाला सुखाची असण्याची जाणीव ठेवावी लागते.

तसंच भगवंताच्या सर्व जिवांबद्दल असलेल्या नित्य शुद्ध,

कल्याणबुद्धीचं स्मरण टिकवावं लागतं. ही सारी मानसिक तपंही या 'नित्य प्रसन्न' राहाण्यात येऊन जातात.

नित्य प्रसन्न राहायला चित्त विशाल असावं लागतं. त्यात स्वार्थापलीकडं जायची खंबीर तयारी लागते, इतरांचं हित होताना पाहाण्याचा व त्यात आनंद घेण्याचा मनाचा थोरपणा लागतो, आपल्या हिताच्या गोष्टी घडण्यासाठी योग्य काळाची प्रतीक्षा करण्याची सबुरी लागते.

म्हणून 'नित्य प्रसन्नता' ही भगवंताबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग व आदर्श साधनाही होय.

*

# २०.

## शरीरशक्ती व धनशक्ती मोठ्या, पण अशाश्वत आहेत. ईशशक्ती शाश्वत आहे, हे लक्षात ठेवा.

- श्री जयरामनाना महाराज

कुणाही माणसाला शरीराची शक्ती किती गरजेची आहे आणि उपयोगाची आहे, हे सांगायची आवश्यकता नाही. कदाचित तो शरीराचं महत्त्व पुरेसं ओळखू शकत नसेल, त्याविषयी सावध नसेल पण त्याचं मूळ अस्तित्वच या शरीरशक्तीवर अवलंबून आहे. म्हणून तर पोटासाठी रोज उठून कुठलाही भलाबुरा उद्योग असो किंवा भिक्षा मागून असो, तो पोट भरून शरीरशक्ती टिकवायचा आटोकाट प्रयत्न करीत असतो.

हीच गोष्ट त्याच्या लौकिक व्यवहारात पैशाच्या शक्तीची आहे. अनुभवानं त्याला एकदा पैशाचं व्यवहारातलं स्थान कळलं, पैशाशिवाय सध्याच्या काळात तरी जीवन-व्यवहार शक्य नाही, हे समजलं की, माणूस पैशाबद्दल, तो मिळवण्याबद्दल, राखून ठेवण्याबद्दल इतका सावध होतो की, शरीरशक्ती व धनशक्ती मिळवणं, त्यांचा संचय करणं हेच मग हळूहळू माणसाचं आयुष्यातलं प्रधान कर्तव्य होतं. बाकीचं बहुतेक सारं जगही याच मार्गानं जात असल्यानं ही जीवनपद्धत त्याच्या अंगवळणी पडणं सोपंच होतं, यात मोठं वेगळं काही नाही.

याचा फक्त एक दुष्परिणाम असा होतो की, या पलीकडं पाहायची माणसाची ताकदच माणूस कालांतरानं विसरतो. किंबहुना शरीर व पैसा

एवढंच आपलं जग आहे आणि त्यातच आपल्या जन्माची इतिकर्तव्यता आहे, अशी माणसाची धारणा पक्की होत जाते. मग त्यासाठी वाटेल ते मार्ग अवलंबणं हेही त्याला क्षम्यच नव्हे, तर योग्य वाटायला लागतं. त्याचबरोबर ज्यांनी शरीर व पैशाच्या सुखाची लयलूट मिळवली ते लोक त्याचे आदर्शच ठरतात व मग शरीराच्या सुखाच्या साधनांची एका पुढं एक रास रचण्यात वर्षानुवर्षं जातात अन् पैशांचा संचय वाढवीत नेण्यानंच अवघं आयुष्य व्यापलं जातं.

क्षणभर या दोन्ही शक्तींची दुसरी बाजूही विचारात घेऊ. शरीरशक्तीची गरज कितीही असली तरी तिला तिची मर्यादा तर असतेच. जसं भुकेपोटी जेवणं अगदी गरजेचं असलं, तरी पोट भरल्यावर माणूस जेव म्हटलं आणि असलं तरी जेवू शकत नाही.

त्यातही पुन्हा जेवण गरजेचं असलं तरी शरीराला पोषक गोष्टींचीच गरज असते. वरवर सुखकारक व चवीचं खाणं या साऱ्या आपल्या गरजा नसून हौशी असतात. दुर्दैवानं या हौशींना मर्यादा नसतात व हे लक्षात येत नाही.

शिवाय तिसरी गोष्ट अशी की, अशा तऱ्हेनं शरीरशक्ती टिकवायचे कितीही प्रयत्न केले तरी एखाद्या दिवसाचीसुद्धा या शरीरशक्तीची किंवा अवयवांची, कार्यक्षमतेची खात्री नसते. क्षणभरात एखादा भाग, एखादं शरीरकार्य लटकं पडतं. इतकंच काय सबंध शरीरसुद्धा निष्प्राण - निकामी ठरू शकतं.

तीच गोष्ट थोड्याफार फरकानं धनशक्तीची आहे. त्यावर व्यवहार तर चालतोच, पण त्या धनशक्तीची 'वाटेल ते' करण्याची क्षमता आहे, अशा भ्रमात आपण असतो. तिला धक्का देणारे अक्षरशः शेकडो प्रसंग आजूबाजूला घडताना दिसतात. पैसा भरपूर आहे, पण असा आजार होतो ज्यावर औषध नाही, ज्या आजाराचं निदान होत नाही, शरीराचे

होणारे असह्य हाल त्या पैशानं थांबवता येत नाहीत. पैसा असतो, पण वेळप्रसंगाला मदतीचा हात द्यायला माणूस मिळत नाही, मायेसाठी आसुसलेल्या जिवाला मायेची ऊब पैशानं मिळत नाही, हे सारं धनशक्ती असून घडतं.

पैशानं मानमान्यता लौकिक खरेदी करता येतात, पण टिकत नाहीत, घेतलेले खरे असत नाहीत आणि ते खरे नाहीत याची मनाची बोच दूर करता येत नाही. जिथं बुद्धी लागते, तिथं ती कमी असली तरी पैशानं वाढवता येत नाही. पैशानं युक्ती काढता येत नाही. मनाची मरगळ दूर करता येत नाही. पैशानं मनाचं नैराश्य टाळता येत नाही. अशा असंख्य बाबतीत या शक्तीचं लटकेपण व अशाश्वतपण लक्षात येऊ शकेल.

या दोन्ही शक्तींच्या बाबतीत आणखी एक वैशिष्ट्य खरोखरी जाणून घेण्यासारखं आहे. शरीराची शक्ती, तिच्या गरजा या मुळात निसर्गनिर्मित व त्यामुळंच अत्यंत माफक आहेत. शरीरसुखाच्या कल्पना भ्रामक, अमर्याद व मानवनिर्मित आहेत, म्हणून त्या सदोष आहेत.

'पैशाची' गोष्ट तर याहीपेक्षा निकृष्ट आहे. ती शक्ती निसर्गनिर्मित नाही. शरीराला, त्याच्या या शक्तीला व मूळ माफक गरजांना मर्यादित प्रमाणात तरी जिवंतपणा - अपरिहार्यता - नैसर्गिकता आहे. 'पैशाला' तीही मुळात नाही.

व्यवहार सुलभ व्हावा म्हणून बनवलेली ती पूर्णपणे मानवनिर्मित व्यवस्था आहे. पूर्वी अगदी कमी प्रमाणात व रास्त असलेली ही गोष्ट आहे. मानवनिर्मित व अनैसर्गिक असल्यानं तिला जिवंतपण नाही. व्यवहार करताना वेळेला थोडंसं खरेपण असलेली अशी पैसा ही कृत्रिम गोष्ट आहे.

पैसा त्याच्या सामर्थ्याविषयी माणसात कितीही भ्रम उत्पन्न करो व भले बहुतांश जग त्याच्या मागे लागण्याचा काळ येवो, तो पैसा मुळात

कृत्रिम व केवळ व्यवहारसुलभतेचं एक मर्यादित साधनच राहाणार. तो अशाश्वतही राहाणार. माणसाला कधी अपरिहार्यही ठरणार नाही, माणसापेक्षा-निसर्गापेक्षा-ईश्वरापेक्षा तो कधी मोठा होऊ शकणार नाही आणि शांती-समाधान मिळवायला उपयोगीही पडणार नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर आता या सर्व व्यवस्थांच्या मुळाशी असलेली आद्य, परिपूर्ण, स्वतंत्र, अनंत सामर्थ्यवान अशी 'ईश' शक्ती समजून घेतली, तर मग तिला या वचनात शाश्वत, एवढी महत्त्वाची व लक्षात ठेवण्यासारखी का मानली आहे, ते कळू शकतं.

सध्या या तीन शक्तींपुरताच विचार केला, तर त्यांतला 'पैसा' मानवनिर्मितच आहे. ज्या माणसानं सोनंनाणं आधार मानला त्यानंच कागदाचा कपटाही आधार मानला, ज्यानं एक चलन उत्पन्न केलं तोच उद्या दुसरं उत्पन्न करील, एक रद्द करील, दुसरं सुरू करील.

दुसरी राजवट आली, तर पहिला पैसा मातीमोल ठरवील. कदाचित माणूस काळाच्या मागं जाईल व वस्तूंच्या विनिमयानं व्यवहार करील. पण हे सारं करणाराच मुळात पन्नास शंभर वर्षं टिकणं कठीण, त्याच्या सत्ता, राजवटी, कल्पना पाच-पन्नास वर्षं टिकणंही कठीण. त्या पैशानं शाश्वतता, आनंद सुखसमाधान मिळवण्याचं तर सोडूनच द्यावं लागेल. शरीरशक्ती यापेक्षा थोडी श्रेष्ठ, पण अखेर अशाश्वत, क्षणभंगुर. शाश्वत आनंदाच्या प्राप्तीसाठी साधन म्हणून उपयोगी असेल, पण ती स्वतः आनंद किंवा साध्य म्हणून निरुपयोगी.

म्हणून तर निरोगी माणसंही भेटतात, एकही औषध मला गेल्या पन्नाससाठ वर्षांत घ्यावं लागलं नाही, असं अभिमानानं म्हणणारी माणसंही भेटतात. पण शाश्वत आनंदाला, शाश्वत सुखाला पारखी असताना दिसतात. त्यांच्या शरीराचं काय ते कौतुक करू, पण एरवी मतलब, स्वार्थ, मत्सर - अशा अनेक दुःखद गोष्टी त्यांच्या ठिकाणी आढळतात

त्यात पुन्हा हे निरोगीपण कुठल्या दिवशी उजाडल्यावर राहाणार नाही, ते सांगता येत नाही, कारण ते कुठल्यातरी निसर्गशक्तीवर अवलंबून आहे, म्हणून अशाश्वत आहे.

आता अधिक शाश्वत, चिरंतन वाटणाऱ्या निसर्गशक्तीचा विचार करू. निसर्गशक्ती काही प्रमाणात दृश्य स्वरूपात दिसते. माणसाचं शरीर किंवा पुढं त्यानं निर्माण केलेला पैसा या साऱ्या इतर गोष्टींचा मूलाधार दिसते. निसर्गशक्ती काही प्रमाणात स्वतंत्र व अवाढव्य आहे. तिच्यात सुरळीतपणा, विलक्षण नियमबद्धता दिसते. तरीही तिच्या शक्तीचं सारं स्वरूप दिसत नाही.

जसं फळापासून मुळापर्यंत, बीजापर्यंत शोधत जाता येतं, पण अखेर त्या रिकाम्या पोकळीत दृश्यातली कारणपरंपरा दिसणं संपतं. कारणपरंपरा मात्र सुरू राहते. फक्त ती आता दृश्य राहात नाही, दिसत नाहीशी होते. तिथंच न दिसणाऱ्या पण साऱ्याचा आधार व कर्ता असलेल्या शाश्वत ईशशक्तीचा प्रत्यय येतो, सुरुवात होते.

वर म्हटल्याप्रमाणं निसर्गशक्तीच्या साऱ्या अवाढव्यपणालाही धारण करणारी, तिची व्यवस्था लावणारी, तिच्यातली सुसूत्रता सांभाळणारी, वेळी तिच्यातले अतर्क्य बदल, विनाश-प्रलय व पुनर्जीवन ही सारी चक्रं सांभाळणारी ईशशक्ती हाच खरा अतूट, शाश्वत आधार आहे याची कल्पना येईल.

निसर्गातल्या आनंददायीपणाचा, जिवंतपणाचा, सर्जनशीलतेचा खरा आधार 'ईश'शक्ती आहे, हे एकदा कळलं की, मग याच ईशशक्तीचा निसर्गात, मानवी शरीरात इतर ठिकाणीही कोणत्या स्वरूपात आढळ होतो याची कल्पना येईल, मग माणसाकडं 'शरीर'म्हणून पाहिलं जाणार नाही. त्याच्या ठिकाणचा भगवंत दिसेल, तसं त्याच्याशी वागताही येईल.

या ईशशक्तीची एकदा ओळख झाली की, तिचं भान आयुष्यात कायम टिकवावं, हा या सुवचनाचा गर्भितार्थ आहे. ते स्मरणानं टिकवता येईल, उपासनेनं टिकवता येईल. आपला व्यवहार करताना धनशक्तीला वा शरीरशक्तीला रास्त महत्त्व कसं द्यावं ते लक्षात येईल. जगताना धन-शरीर या शक्तींचं मर्यादित मोठेपण ओळखून पण त्यांची अशाश्वतता व लटकेपण लक्षात ठेवून भगवंताला आयुष्यात कसं महत्त्वाचं स्थान द्यावं ते कळेल.

याचा दृश्य, व्यक्तिगत व सामाजिक फायदा असा की, अकारण शरीरसुखाच्या राशी रचण्याकडं कल कमी होईल, धनाचा अकारण लोभ व संचयवृत्ती नष्ट झाल्यानं स्वत:चं व इतरांचं स्वास्थ्य समाधान तर वाढेलच, पण या स्पर्धेत न टिकणाऱ्या वंचितांच्या वाट्याला या सुखांचा व धनाचा वाटा येईल जो एकूण समतोल व स्वास्थ्यही वाढवील.

म्हणून शरीरशक्ती व धनशक्तींचं योग्य स्थान व ईशशक्तीचं शाश्वत व श्रेष्ठ स्थान ओळखून वागण्यात आपलंच कल्याण साधेल.

*

# २१.

## आपला अनुभव इतरांना मिळावा यासाठी सांगितलेल्या क्रिया हा ज्या त्या धर्मातला आचार होय.

- पू. मामासाहेब दांडेकर

वारीच्या काळात शेकडो - हजारो लोक गावोगावाहून एकमेकांची सत्संगती साधत, ऊन-पाऊस-वारा-तहानभूक-सोयी-गैरसोयी अशा अनेक गोष्टी सोसत पंढरीच्या दिशेनं वर्षानुवर्षं निष्ठेनं मार्गक्रमणा करतात. समवेत पालखी-पादुका-फोटो असतात, आपापल्या चीजवस्तू असतात, वीणामृदंग असतात, वजनदार टाळ, तुळशी असतात. कशाचं ओझं वाटत नाही, कुणाची अडचण होत नाही. कुठल्या अस्मानसुलतानीला कुणी डरत नाही. घरच्या अडीअडचणींचा बाऊ करीत नाही. लांबलेल्या पावसाचा, पीकपेरण्यांचा, मशागतींचा भार डोक्यावर वागवीत नाही. नेहमीच्या सवयी-वस्तू-स्वच्छता-वेशभूषा-मानप्रतिष्ठा अशी असंख्य बिनगरजेची ओझी घरी खुंटीला आनंदानं टांगलेली असतात.

श्री ज्ञानेश्वर माउलींची पालखी म्हणजे तर भक्तिविश्वाचं वैभव. त्यात माणसांचा अंदाज गवसत नाही, गर्दीचं गणित उलगडत नाही, व्यवस्थेचं रहस्य कळत नाही, भक्तिभावाचा महासागर उल्लंघता उल्लंघत नाही. एका वेळी वारीतली पहिली नि शेवटची दिंडी, नजर कितीही अनुभवी-व्यापक-कुवतीची असली तरी एका वेळी नजरेत येत नाही. चारपाच वर्षांचं मूल पांडुरंगाच्या ओढीनं पाय फास्टत बिनतक्रार चालून

त्यागाचे किंवा सेवेचे धडे शिकतं... अशासारख्या अनेक गोष्टी कळणंही कठीण जातं.

माणसांना अनेक धर्म असतात. त्यातला सदाचारप्रधान, भक्तिप्रधान असा हा एक व्यापक वारकरी धर्म काय करतो ते शिकावं, समजून घ्यावं असंच आहे. धर्म म्हटलं की, अनेकांच्या भुवया वर जातात, अनेक जण विचारात पडतात.

काही हिरीरीनं सांगू लागतात, काही आग्रही बनतात, काही टीकेला उद्युक्त होतात. काही वादाची भूमिका घेतात, काही धर्मांचे तोटे- धर्मांच्या नावावर झालेल्या अपरिमित हत्यांची आकडेवारी काढू लागतात. पण मूळ धर्माचं खरं स्वरूप किंवा त्याचा उगम असा आहे का, हे समजून घेणं आपल्याच हिताचं आहे.

ते समजून घेताना पूज्य मामासाहेब दांडेकर यांचं हे वचन उपयोगी आहे. त्याचा अभिप्राय असा की, काही माणसं प्रयोगशील असतात. ती जीवनातली आनंद, शाश्वतता, भगवंत अशी अनेक श्रेष्ठ मूल्यं आपल्या विलक्षण प्रज्ञेनं शोधतात. गवसलेली सत्यं आचरणात आणतात. त्या सत्याचरणामुळं त्यांना अत्यंत दुर्लभ आणि माणसाच्या जीवनाचं परिवर्तन आणि सार्थक करणारे विलक्षण अनुभव येतात.

त्यांचं स्वत:चं जीवन नि:स्वार्थीपणानं आणि परमानंदानं भरून राहिलेलं असलं, तरी हा अनुभव इतरांना कसा मिळेल यासाठी ते सखोल चिंतन करतात. कोणत्या पद्धतीनं जीवन जगलं म्हणजे हा दुर्लभ आणि सार्थक करणारा आनंदानुभव सर्वांना येईल याची रूपरेषा ते ठरवतात. ही रूपरेषा अंमलात यावी म्हणून जीवनाची ठेवण विधायक करणारे अनेक आचार ते सुचवतात, ठरवतात. अशी आचारसूत्रं म्हणजे धर्म होय. अशा धर्माच्या मूळ आचारसूत्रांचा प्रयोग केला तर कुणाचंही जीवन उच्चतर होतं, सार्थकाचं होतं, त्यामुळं समाजजीवनाची प्रतही उंचावते.

शाश्वत मूल्यं थोर असली, कल्याणकारी असली तरी त्यांचा अनुभव यायला अशा आचारसूत्रांची गरज असते. प्रचलित मोठमोठे धर्म बाजूला ठेवून हा परिचित भागवतधर्म पाहिला, त्यातला एक वारीचा, नित्य नामस्मरणाचा, व्यसनांपासून दूर राहाण्याचा - असे अनेक आचार पाहिले तर श्री मामांच्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. एका वारीच्या निमित्तानं माणसावर अनेक उपयुक्त संस्कार घडतात.

ऊनपावसात सातत्यानं राहण्यानं मनाला नित्य जीवनातले प्रतिकूलतेचे ऊनपाऊस सोसता येतात. तिथल्या सोयीगैरसोयीत आपण राहू शकतो - अनेक उणिवांच्या उपस्थितीतही आपलं उत्तम चालतं, हे अनुभवून नेहमीच्या आयुष्यातल्या अनेक अपरिहार्य उणिवा सुसह्य तर वाटतातच, पण विशेषत: त्याबद्दलच्या तक्रारी-अस्वस्थता इतरांवरचे राग कमी होतात, असलेल्या सुविधांचं मोल खूप वाढतं.

वारीत अनेक गोष्टींतलं परावलंबन, स्वावलंबनातला एरवीचा अहंकारही कमी करतं - इतर माणसांचं, त्यांच्या सहकार्याचं-सहवासाचं मोल वाढवतं. दिंडीतली डोळ्यांत आणि डोक्यात न मावणारी माणसं-व्यवस्था - उपासना - दर्शनं आपल्या चित्ताची नेहमीची 'मी नि माझं विश्व' ही संकुचितता कुठल्या कुठं पळवून लावतात आणि मनाला विशालतेचं वळण देतात - अशा एक ना दोन असंख्य गोष्टी या धर्माच्या एकाच आचरणानं साध्य होतात तर इतर आचारांनी आणखी किती प्रगती घडेल याची कल्पनाही करणं मोठं आनंददायी आहे, अनुभव किती अमोल असेल ! मामांच्या जीवनात असे त्यांच्यामुळं इतरांना मिळालेले उच्चतर जीवनाचे अनुभव अक्षरश: अगणित आहेत.

मामा एका अडाणी, गरीब कुटुंबात बोलताना म्हणाले, 'बाई मुलाला आधी शिकवा. स्वत:च्या पायावर उभं करा नि मग संसाराला लावा.म्हणजे घरात सुख नांदेल. माउली तिथं आपणहून राहायला येईल.

मुलाला वारीचं वळण ठेवा.' चार वाक्यांनी दरिद्री घर पुढं स्थिर, संपन्न पण ईश्वरभक्त, सुस्वभावी आणि शांत झालं.

एकदा एका बहुतांश व्यसनाधीन असलेल्या माणसांच्या वस्तीवर म्हणाले, 'आपणच संसाराचं मातेरं करून नशीबाच्या नावानं ओरडू नका. नशीब तुमच्या हातात आहे, चांगले राहा. देव तुम्हाला पुरणपोळी देईल...'

तपस्वी शब्दानंच वस्तीचं मन पालटलं, व्यसनं सुटली, शांतता नि सौख्य आलं. मामांच्या उपदेशानं, वारकरीधर्माच्या संस्कारानं सुधारलेल्या मुलाचे म्हातारे वडील एकदा मामांना भरल्या कंठानं म्हणाले,'तुमच्या सांगण्यामुळं आता मुलगा तोंडात पाणी घालील. आम्हाला आता उशीर झाला, पण पुढल्या जन्मी तुमच्या सेवेत येईन !'

अत्यंत उच्च जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन निर्मिलेली सूत्रं म्हणजे धर्म ! या दृष्टीनं विविध धर्मांकडं पाहावं. म्हणजे धर्माचं मूळ स्वरूप कळू लागेल. त्यावर साचलेल्या अकारण दिशाभूल करणाऱ्या मतांची जळमटं दूर होतील. मूळ कल्याणकारी धर्ममूर्ती स्वच्छ होईल, दिसू लागेल, उपयोगी ठरेल. त्यासाठी धर्माच्या आचारांची दृष्टी लक्षात येण्यासाठी पूज्य मामासाहेबांच्या या वचनातून शिकता येईल.

*

# २२.

# आम्हाला धरता येते, पण सोडता येत नाही !

- श्री माणिक प्रभू

आपल्यासारख्या असंख्य सामान्य-असामान्य जीवांचा उद्धार व्हावा म्हणून आजन्म अक्षरशः राबणाऱ्या अनेक संतांनी बोलण्याच्या ओघामध्ये, अभंगांमध्ये, संवादांमध्ये, काही वेळा संदेशांमध्ये आपली स्वतःची काही वैशिष्ट्यं, ब्रीदं सांगितली आहेत. जसं 'तू भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' असं श्री अक्कलकोट स्वामी म्हणतात किंवा 'जेथे नाम तेथे माझे प्राण । ही सांभाळावी खूण' असं श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात.

तसं गुरुसार्वभौम किंवा सकलमतस्थापित किंवा भक्तकार्य-कल्पद्रुम म्हणून ख्याती असलेल्या श्री माणिकप्रभूंचं 'आम्हाला धरता येतं, पण सोडता येत नाही' हे एक ब्रीदच आहे आणि साधकांना-भक्तांना ते अत्यंत आश्वासक आहे, यात शंका नाही.

सामान्य माणसाला परिचित असतात ते व्यवहारातले संबंध. त्यांत त्याला गरज पडली की ती पुरी करणाऱ्याला वेळी एकाला किंवा अनेकांना तो हाताशी धरतो. श्रेष्ठ असला, शक्तिशाली असला तर त्याला विनंती करून किंवा कमी प्रतीचा पण वेळेला गरजेचा, उपयुक्ततेचा असला तरी अशा माणसाला नाईलाजानं वेळी बळावरसुद्धा हाती धरतो आणि आपलं काम तो पुरं करतो.

आपलं काम पुरं झालं की मात्र अशा सशक्त, अशक्ताला तो सोडून देतो, ओळख विसरतो, इतकंच काय तो प्रसंग विसरून, वेळी त्यानं केलेली मदतसुद्धा विसरतो.

असं घडतं की, अनेकदा कधी त्या माणसाला गरज पडते, त्यावेळी त्याची हाक येण्यापूर्वी आपण काहीतरी करायचं असतं याची जाण तर त्याला राहातच नाही. पण अनेकदा हाक येऊनही आणि याला शक्य असूनही तो सबब देतो, मदत करणं टाळतोसुद्धा ! आमचं कुणाला धरणं न धरणं काय किंवा सोडणं न सोडणं काय स्वार्थापोटीच असतं. हे दुर्दैवाचं, चुकीचं असलं तरी 'व्यवहारा'चं नाव देऊन जगराहाटीत ते बसून जातं, बसवून टाकलं जातं.

संतांकडची परिस्थिती मात्र अशी नाही. संतांकडचं सामर्थ्यही सामान्य माणसांसारखं मर्यादित असत नाही. आधी म्हटलं तसं कुणी आपल्याला हाक मारायला, आपली मदत मागायला आपल्याकडं मदत करण्याएवढी शक्ती, कुवत, समर्थता लागते. संत दाखवोत किंवा न दाखवोत त्यांच्याकडं - त्यांच्याजवळ सदैव आनंदानं राहाणाऱ्या भगवंतामुळं - अपार शक्ती असते.

सामान्य मनुष्य त्याच्या लौकिक प्रयत्नांमुळं, त्यावरच्या मर्यादांमुळं थकतो, अपुरा पडतो, अयशस्वी होतो. अशा वेळी भाग्यवशात त्याला कुणा संतांची ओळख झाली, माहिती झाली, त्यांची मदत घ्यायची बुद्धी झाली तर तो त्यांना साद घालतो, मदतीसाठी हाक देतो.

सामान्य माणूस काही कारणांनी या हाकेला प्रतिसाद देईलच असं नाही, पण संत-सत्पुरुष मात्र अशी हाक येताक्षणीच आहे तिथून 'ओ' देतात, मदत करतात. अनेकदा संकट अशा स्वरूपाचं असतं की, त्याक्षणी काही मदत करण्यानं ते निवारण होऊ शकतं.

जसं श्री प्रभु हयात असताना पोरबंदरहून मुंबईकडं येणाऱ्या

जहाजातून लाखो रुपयांचा माल घेऊन येणाऱ्या व्यापाऱ्याच्या बाबतीत घडलं. अकस्मात वादळ सुटून जहाजावरचा ताबा जाऊन ते बुडणार असं दिसू लागताच प्रभूंना ओळखणाऱ्या जहाजातल्या एका गृहस्थानं या व्यापाऱ्याला सुचवलं की, सर्वसमर्थ असा हा प्रभुअवतार असून आपण आर्ततेनं प्रार्थना करू.

म्हणून प्रभूंचं नावही न जाणणाऱ्या त्या व्यापाऱ्यानं ती प्रार्थना केली. इकडे प्रभू दरबारात बसले असता त्यांच्या कानी ती हाक जाऊन त्यांनी सर्वशक्तीनिशी अचानक हात वर केले, इकडे जहाज बुडत होतं, त्याला टेकू दिला गेला आणि ते वाचलं.

प्रभूंचे हात मात्र ओले झाले होते. अंगातला कबा समुद्राच्या पाण्यानं भिजला होता. कारण तिथल्या जवळच्या इतरांनी पाहिलं - पाणी खारट होतं. संकटात हाक मारणाऱ्याला कसं धरता येतं, ते प्रभूंनी आपल्याला दाखवलं होतंच, पण त्याचं जहाज पुढचा प्रवास तशा स्थितीत सुखरूप पुरा करून पोचलं, त्या व्यापाऱ्याचा व्यापारही तारला. पुढं कायमच त्याचं कल्याण केलं.

ही तर हाक मारणाऱ्याची हकीगत. पण गरीबीत नोकरीतले दिवस कंठणारे विठ्ठलराव हे पायगा इलाख्यातले. त्यांच्या पत्नीची प्रभूंवर श्रद्धा असली तरी ते मात्र सश्रद्ध तर नव्हतेच, पण उलट तिला नावं ठेवीत.

उगीच कुठल्या साधूच्या नादी लागतेस म्हणून दूषणं देत. कारकुनी यथातथा, दारिद्र्यानं गांजलेले, त्यात मुलीला अपस्माराचा आजार - अशा दीनवाण्या अवस्थेमुळं एक दिवशी कुठली श्रद्धा नसताना केवळ पत्नीच्या आग्रहापोटी प्रभूंकडं एकदा 'नुसतं यायला' तयार झाले. म्हणजे मनाची तयारी - मनापासून नमस्काराचीही तयारी नाही, तरीही भेटल्यावर प्रभूंची कृपा झालीच.

अंतरंग जाणून प्रभूंनी एका उदात्त, कल्याणकारी अर्थानं त्यांना 'हाती धरलं'. विठ्ठलरावांच्या ठिकाणी श्रद्धा उत्पन्न झाली. प्रभूंनी त्यांना तात्कालिक मदत तर केलीच, पण 'हाती धरलेलं सोडता येत नाही' या ब्रीदानं पुढं या विठ्ठलरावांवर सावत्र आई व भावंडांचीही जबाबदारी होती, तेही जाणलं.

अचानकपणे त्यांना दोनशे रुपये आणि काही सोनं दिल्यास काय कराल, असं विचारलं. वृत्ती शुद्ध असल्यानं विठ्ठलरावांनी या धनाचा विनियोग करून या सावत्र नातेवाईकांची लग्नकार्यं अशी निकडीची कामं करू, असं म्हटलं. संतुष्ट होऊन प्रभूंनी ते सर्व दिलं.

पुढं ही कामं झाल्यावरसुद्धा त्याच सावत्र मंडळींची बुद्धी फिरून त्या मंडळींनी विठ्ठलरावांवर विषप्रयोग केला. प्रभूंनी तो बसल्या जागी जाणून स्वत:वर घेतला, सोसला.

इतकंच नव्हे तर या दारिद्र्यात कारकुनी करणाऱ्या शुद्ध मनाच्या भक्ताला - विठ्ठलरावांना एकदा हाती धरल्यावर अखेरीस त्याच तालुक्याचे त्या काळचे तालुकदार म्हणजे 'तहसीलदार' पदावर नेलं. हे तर लौकिक कल्याण केलंच, पण अंतरंगीची प्रेम, भक्ती, निष्ठा, साधना वाढून अखेरीस त्यांना उद्धरून नेलं.

म्हणून संतांकडं आर्ततेनं जावो, जिज्ञासेनं जावो एकदा त्यांनी कृपादृष्टीनं स्वीकारलं म्हणजे आपण त्यांना सोडतो म्हटलं तरी ते सोडीत तर नाहीतच, पण लौकिक-अलौकिक सर्व कल्याण साधून देईपर्यंत त्या जीवाला जन्मोजन्मी धरून ठेवतात, हे समजून घेण्यासारखं आहे.

सामान्य माणसाची नफा-तोटा, फायदा-नुकसान पाहून माणसाला जवळदूर करण्याची वृत्ती असते. त्या पुढं संतांच्या वृत्तीची ही श्रेष्ठता किती उंचीची, आदर्श आहे, याची थोडी तरी कल्पना आपल्याला करता येईल. त्यामध्ये त्यांच्याकडचं सामर्थ्य तर आहेच,पण करुणा, प्रेमही आहे.

सामान्य माणूस एक वेळ एखाद्या अडचणीपोटी अशा समर्थ संतांकडं जाईल, पण आपलं काम त्यांच्या सामर्थ्यानं होताच त्यांना विसरून जायला तयार होईल. इतर सामान्य मदतकर्ता कुणी सामर्थ्यवान असेल तर तो ज्याला त्यानं मदत केली अशा त्या सामान्य माणसाकडून मदतीचं मोल मागेल, दाम मागेल, कुठली का होईना अपेक्षा बाळगील. सामान्यांचे व्यवहार असे - एवढेच राहतील.

पण श्री प्रभूंसारखे संत आपल्या वचनात सांगतात तो व्यवहार इतका वेगळा आहे की, अशा सामान्य माणसाची प्रापंचिक, तत्कालिक नड ते पुरी करतीलच. पण त्याच्याकडून कसली अपेक्षाही बाळगणार नाहीत. उलट नड भागल्यानं, गरज संपल्यानं पुन्हा आपल्या भ्रामक प्रपंचात बेसावधपणे गर्क होणाऱ्या या आपल्यासारख्या सामान्य माणसाची कल्पना, झेप ते जाणतात.

विशेषत: आपली साधनेची, मनाच्या बद्धतेची, जीवाच्या मुक्तीच्या प्रगतीची अवस्था जाणून घेऊन अशा तऱ्हेनं घटना घडवून आणतात किंवा आपल्याला सावध करतात की आपली भगवंताकडची वाटचाल सुरू राहावी, त्यात आपण प्रगतिपथावर असावं, त्यात लागणारी मदत सर्वतोपरी व्हावी आणि एकदा हाती धरलं ते जिवाचा उद्धार करूनच त्याला सोडावं.

म्हणून आपली जीवनं, जीवनपद्धती, खरी प्रगती, खरी ध्येयं यांचा विचार केला की असं वाटतं की, 'आम्हाला धरता येते, पण सोडता येत नाही' अशी खात्री देणाऱ्या श्री माणिकप्रभूंसारख्या संतांचीच आपल्याला गरज आहे. त्यांच्या चरित्राचा, उपदेशाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

कारण आपल्या देहबुद्धीचा जोर विलक्षण आहे. या संतचरित्रांच्या, उपदेशाच्या अभ्यासानं हा देहबुद्धीचा जोर थोडा तरी कमी होऊ शकतो.

कारण तो कमी झाला नाही तर त्यापोटी आपण त्यांना आणि अर्थातच भगवंताला, भगवंताच्या मार्गाला सोडण्याची शक्यता आहे.

म्हणून एकतर मानवी कर्तृत्व लटकं म्हणून, दुसरं म्हणजे मायामय प्रपंचाच्या तावडीत पुन्हा पुन्हा अडकण्याची घातक व दाट शक्यता म्हणून आणि तिसरं म्हणजे नरदेहाच्या सार्थकासाठी खऱ्या शाश्वत आनंदाची ओढ लागावी म्हणून अशा अनेक कारणांसाठी आपल्याला सूक्ष्मपणे धरून ठेवणाऱ्या सत्पुरुषांची मदत होते.

अशा वेळी असेच समर्थ पण करुणामय सत्पुरुष आपल्याला हाती घट्ट धरून उद्धरून नेतील, ज्याची आपल्याला खरी गरज आहे.

*

# २३.

## कृपा सर्वांवर सारखीच असते, फक्त प्रत्येकाची ती कृपा स्वीकारण्याची क्षमता वेगवेगळी असते.

- स्वामी रामदास

आपण गुरूंकडं, भगवंताकडं जातो तेव्हा आपली प्रगती व्हावी असं जवळजवळ सर्वांनाच वाटतं. प्रगतीच्या प्रत्येकाच्या कल्पना थोड्याफार कमीजास्त प्रगल्भ असतात एवढंच. आपल्याबरोबर अशा गुरूंकडं किंवा देवळात जाणारे इतरही अनेक लोक असतात. तेही अशाच पारमार्थिक प्रगतीच्या अपेक्षा घेऊन आलेले असतात. अशा वेळी आपलं नकळत इतरांकडं, त्यांच्या प्रगतीकडं लक्ष जातं.

मग इतर बारीकसारीक फरक लक्षात घेतले जातात. कुणी आधीपासून येणारा, कुणी आपल्यानंतर अगदी अलीकडं अलीकडं येणारा, कुणी आपल्या बरोबरीचा-असे अनेक भेद दिसतात. विशेषत: देहधारी गुरूंकडं जाणाऱ्यांना हा अनुभव अधिकच येतो.

मग अशा लोकांना असंही आढळतं की, नंतर आलेली काही माणसं अधिक प्रगती करून गेली, अनेक वर्षं येणाऱ्या काही माणसांच्यात मात्र काहीच प्रगती दिसत नाही, काही बाबतीत आपल्यापेक्षा कमी कुवतीच्या वाटणाऱ्या काही लोकांना मात्र परमार्थात काही जास्त साध्य झालं, असंही दिसून येतं.

ज्यांचा या विषयाशी काही संबंध नाही,अशांनासुद्धा कुणाकडं जाऊन कुणाची किती प्रगती झाली, विशेषत: काहींची कमी-जास्त कशी झाली - अशा विषयात रस असतो. शिष्यवर्गाचा तर या विचारात बरेचदा वेळ जातो.

हे एवढ्यावर राहात नाही. पुढं जाणारे का पुढं गेले, याचा वस्तुनिष्ठ विचार न करता बरेचदा यासाठी गुरूंनाच दोष दिला जातो. गुरूंच्या ठिकाणीच भेदभाव आहे, काही त्यांच्या मर्जीतले, जवळचे म्हणून गुरूंनी कृपेचं माप जणू त्यांना झुकतं दिलं, म्हणून त्या त्या शिष्यांची आपल्यापेक्षा जास्त साधना नसतानासुद्धा जास्त प्रगती झाली, अशा निष्कर्षावरही काही अपरिपक्व शिष्य येऊन पोचतात.

अशांना सावध करणारं हे वचन खात्री देतं की, गुरूंची काय किंवा देवाची काय कृपा सर्वांवर सारखीच असते. ती नि:स्वार्थी, समान व करुणामयच असते. फक्त इथं सांगितल्याप्रमाणं ती कृपा स्वीकारण्याची प्रत्येकाची कुवत, क्षमता वेगवेगळी असते. हा फरक लक्षात घेणं अगदी गरजेचं आहे.

या क्षमतेमध्ये गुरूंनी सांगितलेलं साधन नि:संशयपणे, सातत्यानं, निरपेक्षतेनं करणं, खऱ्या अर्थानं आज्ञापालन करणं, स्वत:ला प्रगतीची आत्यंतिक तळमळ असणं, गुरूंवर अविचल निष्ठा असणं - अशा अनेक गोष्टी असतात.

त्यात प्रत्येक शिष्यागणिक फरक असतो. त्यामुळं स्वाभाविकपणे प्रगतीत फरक पडतो. इतरांशी तुलना करीत बसण्यापेक्षा आपल्यातल्या या क्षमता व त्यातल्या त्रुटी ओळखणं, तसंच त्या दूर करणं, हे खऱ्या शिष्याचं किंवा भक्ताचं काम असतं.

हे लक्षात आलं, तर हे अकारण,अन्यायकारक, निराशाजनक व भेदजनक विचार कमी होतील, गुरू किंवा देव यांच्या कृपेबद्दल

विकल्प येणार नाही, इतर साधकांबद्दल वाटणारी असूया, मत्सर इत्यादी कमी होतील.

अगदी बाह्यांगानं पाहिलं तरी साध्या सत्संगाचा प्रसंग घ्या. अशा प्रसंगात वास्तविक सर्वच वातावरण सारखं असतं. कुणी साधक, सत्पुरुष असतील तर तेही तेवढाच वेळ तिथं असतात. जे भजन, पूजन, आरती, नाम, प्रवचन होतं तेही सर्वांचं सारखाच वेळ असतं. तरीही तिथून बाहेर पडताना प्रत्येकाच्या वृत्तीच्या सात्त्विकतेच्या पातळीत खूप फरक असतो.

त्याची कारणं तर सरळ सरळ त्या त्या व्यक्तींकडं असतात. आपलंच लक्ष सत्संगातही दुसऱ्यांकडं, त्यांच्या येण्याजाण्याकडं, त्यांच्या दोषांकडं, त्यांच्या माळेकडं किंवा मनातल्या कुठल्या तरी विचाराकडं असलं, इकडं तिकडं बघण्यात असलं तर वातावरण काय किंवा गुरू काय सगळ्यांसाठी एकच असले तरी ते या सात्त्विकतेच्या पातळीतल्या फरकाला काय करतील ? येणाराच छोटी किंवा मलीन चित्ताची भांडी घेऊन आला तर तेवढंच आणि तसलंच परत जाताना नेणार आणि शुद्ध, एकाग्र, निष्ठेचे साधक परत जाताना अधिक काही नेणार हा फरक का होतो ते उघड आहे. कारण या वचनात म्हटल्याप्रमाणं स्वीकारणाऱ्यांच्यातच फरक आहे.

हे जर आपण प्रामाणिकपणे लक्षात घेतलं तर मग आपलीच कुवत व कृपा स्वीकारण्याची क्षमता वाढवण्याकडं जाणीवपूर्वक लक्ष राहील आणि त्यासाठी आवश्यक कृती केली तर प्रगतीही घडेल.

*

## संतबोध : भाग -१

निवडक संतवचनांचे भाग प्रसिद्ध झाल्यानंतर अनेकांना त्याचा चिंतनाला उपयोग घडल्याच्या आनंददायक प्रतिक्रिया प्राप्त झाल्या. त्याबद्दल वाचकांना धन्यवाद. या भागांमध्ये समाविष्ट झालेल्या वचनांचे उद्‌गाते संत, हे मानवतेच्या कल्याणाची विलक्षण तळमळ असलेले असून, त्यांचे उद्‌गार हे कुठल्याही सात्त्विक साधकाला उपयोगी पडू शकणारे आहेत. मात्र त्या संतांची विशेष माहिती किंवा त्यांचं नावही फारसं परिचित नसतं किंवा काही वेळा त्या त्या पंथात, प्रदेशात ते प्रसिद्ध असतात तर काही वेळा नामसाधर्म्यामुळं संभ्रम होतो. उदा. स्वामी रामदास, श्री ब्रह्मानंद, श्री विश्वनाथ महाराज, स्वामी शिवानंद आदी. म्हणून निदान अशा बाबतीत थोडी माहिती शेवटी दिल्यास उपयोगी होईल अशा विनंतीवरून त्या त्या भागाशी संबंधित काही संतांची माहिती खाली दिली आहे.

- **स्वामी शिवानंद : पूर्वाश्रमी डॉ. कुप्पुस्वामी, स्वामी शिवानंद सरस्वती, हृषिकेश**
  **काळ : १८८७ ते १९६३ समाधी : हृषिकेश**
- **श्री सहस्रबुद्धे महाराज : श्री बाबामहाराज सहस्रबुद्धे, पुणे**
  **गुरू : श्री बीडकर महाराज, पुणे**
  **काळ : १८८३ ते १९५४ समाधी : पुणे**
- **श्री जयरामनाना महाराज : श्री जयराम अनंत देशमुख वाबळे**
  **गुरू : श्री विठ्ठल शाळिग्राम, संगमनेर**
  **काळ : १७६५ ते १८६२ समाधी : अहमदनगर**
- **श्री स्वामी रामदास : पूर्वाश्रमी पी. विठ्ठल राव, कान्हनगड (केरळ)**
  **गुरू : पिता श्री. बाळकृष्ण राव**
  **काळ : १८८४ ते १९६३ समाधी : आनंदाश्रम, कान्हनगड**
- **श्री माताजी : पूर्वाश्रमी मीरा रिचर्ड, फ्रान्स**
  **गुरू : श्री अरविंद**
  **काळ : १८७८ ते १९७३ समाधी : अरविंदाश्रम, पॉन्डेचेरी**
- **श्री गुप्ते महाराज : श्री मुरलीधर गुप्ते, नाशिक**
  **गुरू : परमहंस नारायण सरस्वती**
  **काळ : १८९२ ते १९४६**

***

# डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

## (आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

**३५. साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

**३६. मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

**३७. बोधपाठ :** आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

**३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) :** आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

**३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) :** जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

**४०. गुरुतत्त्वतरंगिणी :** गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

**४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

**४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation**

**४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :**
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

**५५. शिदोरी :** व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

**५६. विचारविसावा :** विसावा देणारी विचारांची विद्या

**५७. सारविस्तार भाग २ :** चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

**५८. महाराजांची शाळा :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

**५९. साधनपदावली भाग २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

**६०. आरतीपुष्पमाला :** डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

**६१. विनवणीची वाणी :** चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

**६२. श्रद्धेची पहाट :** खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

**६३. उपासनामाला :** येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

**६४. पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

**६५. अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**६६. कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

**६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

**६८.** श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

**६९. संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

**७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

**७१. उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

**७२. अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७३. श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

**७४. अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७५. अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

**७६. जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

**७७. स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

**७८. वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**७९. अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

**८०. वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**८१. भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

नराचे नारायण होणारे संत म्हणजे या युगातले सार्वत्रिक व दृश्य चमत्कार होत. स्वतःसारखी देवत्वाची स्थिती इतर सामान्य माणसांना मिळावी म्हणून निरहंकार, निःस्वार्थी व निःस्पृह वृत्तीनं संत आपलं आयुष्य सर्वांसाठी वेचतात. संतांचा मार्ग शिकण्याचं एक सोपं साधन म्हणजे त्यांची अनमोल वचनं. संतवचनांतून मिळणारा बोध व्यक्तीला जागं करतो, प्रेरणा देतो, नवी दृष्टी देतो.

अशा निवडक संतवचनांचं निरूपण

**संतबोध**

या पुस्तकमालिकेतून

सादर होत आहे.

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।